# धुक्या नभाच्या काळकडा

वी. रघुनाथ



१९५५
म. ग्रं. सं. ठाणे
विषय काव्य
सं. नं. ११३४
REFBK-0008711

# पुन्हां नभाच्या लाल कडा

REFBK-0008711

6099

बी. रघुनाथ

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत.
अनुक्रम 90258 वि. 3/04
क्रमांक 7398 नों: दि: 7-3/2005

मराठवाडा साहित्य परिषद् प्रकाशन

प्रकाशक :
रा. ब. माढेकर
अध्यक्ष :
मराठवाडा साहित्य परिषद्.
इसामियाँ बाजार, हैद्राबाद-द.

आवृत्ति पहिली
७ सप्टेंबर १९५५

मुद्रक :
जयहिंद प्रिंटिंग प्रेस,
मालक : भारत मुद्रक आणि प्रकाशक लि.
नारायणगुडा, हैद्राबाद–द.

# प्रकाशकाचें निवेदन –

बी. रघुनाथ यांनीं आपल्या विविध वाङ्मयकृतींनीं मराठी साहित्यक्षेत्रांत एक मानाचें स्थान प्राप्त करून घेतलें आहे. कविता, लघुकथा, कादंबरी, लघुनिबंध इत्यादि प्रकार त्यांनीं यशस्वीपणें हाताळले आहेत; आणि प्रत्येक विभागांत स्वतंत्र शैली आणि वैशिष्ट्यें प्रकट केलीं आहेत. मागसलेल्या दलित जीवनाच्या भावना रसराशितपणें अभिव्यक्त करण्यांत त्यांना विलक्षण यश लाभलें. ही सर्व सेवा त्यांनीं सर्वस्वी प्रतिकूल वातावरणांत केली. मराठवाडा नुकताच स्वतंत्र झाला. नवीन जीवनाची प्रभा सर्वत्र फाकूं लागली. अशा वेळीं बी. रघुनाथांच्या लेखणीचें प्रभावी लालित्य प्रकर्षानें प्रत्ययास येण्याची शक्यता निर्माण झाली होती. दुर्दैवानें काळाची कुऱ्हाड कोसळली. आकस्मिकपणें व अकालींच बी. रघुनाथांनीं जीवनाचें पैल तीर गांठलें ! मराठी साहित्याची न भरून येणारी हानि झाली.

बी. रघुनाथ यांच्या वाङ्मयीन जीवनास काव्यानेच आरंभ झाला. या 'फुलाऱ्या'ने काव्यसुमांनी शारदेची पूजा बांधली या दृष्टीने बी. रघुनाथांचें सर्व काव्य प्रकाशित व्हावें असें सर्वांनाच वाटत होतें. मराठवाडा साहित्यपरिषदेने ही कल्पना मूर्त स्वरूपांत आणण्याचा संकल्प केला.

बी. रघुनाथ यांचे कनिष्ठ बंधु श्री. सखारामपंत कुळकर्णी यांनीं या कार्यास मोठ्या तत्परतेने संमति दिली. बी. रघुनाथ यांचें वाङ्मय प्रकाशित करणें हें त्यांना एक 'ऋण'च वाटतें. सौहार्दपूर्ण कर्तव्य-बुद्धीने त्यांनीं सहकार्य केलें.

बी. रघुनाथ यांना वाङ्मयीन प्रेरणा देण्याचें कार्य श्री. र. मु. जोशी यांनीं केलें. ते बी. रघुनाथ यांचे केवल विद्यागुरूच नाहीं तर त्यांच्या अंतरंगाच्या मुक्तविहाराचे अकृत्रिम प्रेमाचे आणि डोळस श्रद्धेचे अढळ विरामस्थान होते. त्यांनीं बी. रघुनाथांच्या सर्व हस्तलिखितांचें काळजी-पूर्वक जतन केलें आहे. त्यांनीं या प्रकाशनास सर्वप्रकारें सहकार्य केलें. श्री. र. मु. जोशी यांनीं बी. रघुनाथ यांचें जीवन जवळून निरखलें. त्यांच्या व्यक्तिमत्वाचे विकसन समरसतेने पारखलें. त्यांनींच बी. रघुनाथांचें जीवनचरित्र लिहिणें उचित होतें. या पुस्तकासाठीं बी. रघुनाथ यांची व्यक्तिरेखा श्री. र. मु. जोशी यांच्याकडून लिहवून घेण्यांत आली.

बी रघुनाथ यांनीं आपल्या ग्रंथाचें नामकरण 'पुन्हां नभाच्या लाल कडा' असे केले आणि डॉ. ना. ग. जोशी यांची प्रस्तावना मिळविली होती. ती अन्यत्र दिली आहे.

बी. रघुनाथांची सर्व उपलब्ध कविता या निमित्ताने एकत्र केली आहे. हा संग्रह बी. रघुनाथांच्या विकासाचा मागोवा घेण्यास उपयुक्त ठरेल.

स्वत:च्या कवितासंबंधीं बी. रघुनाथांचें हृद्‌गत कळावें या दृष्टीने त्यांचे एक स्नेही श्री. भगवंत देशमुख यांना बी. रघुनाथ यांनीं पाठविलेल्या एक वैयक्तिक पत्रांतून कवितासंबंधींचा भाग उद्धृत केला आहे. कविताची भूमिका आकलन करण्यास हें हृद्गत निश्चित उपकारक ठरेल.

प्रस्तुत प्रकाशनास सहकार्य करणाऱ्या सर्व व्यक्तींचे हार्दिक आभार.

— प्रकाशक



## हृद्गत –

दिनांक
३–२–४९

प्रिय देशमुख,

सप्रेम नमस्कार वि. वि.

औरंगाबादेहून आल्यानंतर काव्यप्रेरणा-कीं स्फूर्ति?- आवरून धरतां आली नाही 'दिसांमाजि कांहीं तरी' होऊं लागलें. पंधरा नोव्हेंबरपासून २५-१-४९ पर्यंत ज्या कांही कविता केल्या त्या आपल्या निरीक्षण आणि परीक्षणासाठीं पाठवीत आहे त्यांत एक-दोन जुन्या कविताहि असतील. सर्वच अप्रसिद्ध आहेत हें मात्र निश्चित आणि त्यांतहि, एकहि अद्याप प्रसिद्धीला पाठविली नाहीं. कल्पना, विचार आले तसे आणि सुचतील त्या चालींत भरले. कवितांचें लेखन मात्र शुद्ध नाहीं. हें मुद्दाम लिहिलें आहे. कविता पाठवितांना त्या पुन्हां पाहिल्या नाहींत. अनुस्वार नसावा तिथें हटकून पडला असेल. तरी तें ताक नीट फुंकून प्यावें म्हणजे त्यांतलें 'नवनीत' [असलेंच तर] चवीला लागेल.

कवितांची संख्या वीस-बावीस असावी दोन-अडीच महिन्यांच्या जीवनांत विविध दृश्यें दिसलीं; विविध विचार आले; विविध कल्पनांतरंग केले; ते सर्वच या कवितांत आणतां आले नाहात. कधीं विचार गुंफण्यासाठीं चांगले शब्द साधले नाहात; कधीं कविता पूर्ण करतां आली नाही. कांही विचार आले आणि विरले; कांहीं मनांतच ठेवले आहेत. कधीं काळीं पुन्हां लहर लागली तर शब्दांतात साकार होईल. जुन्यांची उजवण होईल आणि नवीनाहि शब्दरूपांत धरून ठेवतां येईल.

आतांपर्यंत झालें त्यांत विविधता आहे. 'हुडहुडी' सारख्या अनुभूतीला शब्दरूप दिलें आहे; तसें उदात्त भावंचें आवाहनहि केलेलें आहे. 'दुपार' सोडली नाही तशी 'मध्यरात्राहे.' त्यांत 'धूर' आहे आणि 'धूळ' हि, 'ज्वार' आहे आणि 'ज्वाला' हि आहेत. 'पुरनारी' आहेत. 'पथनारी' देखील! घर आहे. पथ आहे आणि रस्त्यांतलीं दृश्यहि आहेत.

'पथदीप' ही कविता 'घरांत लागले दिवे' या कवितेवरून सुचली आहे. हैद्राबादच्या अबीडशॉपपुढील रुंद रस्त्यावर रात्रीं एकदम दिवे लागले म्हणजे काव्यात्मक मनाला जें सुचलें तें 'पथदीप' या कवितेंत आहे. 'पांढऱ्या पऱ्या' म्हणजे पांढरे चकचकीत दिसणारे रुपये. लक्ष्मीपूजनाच्या दुकानांतल्या थाळ्यांतून चकचकीत कलदार रुपयांची रास पुढें आणावी; किंवा

माझ्यासारख्या महिन्याकांठीं शंभर रुपये मिळविणारा कारकून आठवावा. पहिल्या तारखेला 'महासभां'च्या टेबलावरली नाण्यांची रास पाहून जें वाटतें तें या कवितेंत आहे. 'पश्चिमे' ही इंग्रजांना उद्देशून लिहिली आहे. 'लहर बहरली गऽ' ही कविता पहा. गुणी माणूस लहरी असतो, तो लहरींत असला म्हणजे चांगलें कार्य होतें; त्या मनोवस्थेला उद्देशून ती कविता लिहिली आहे. 'दुर्मुखली' या कवितेसाठीं माझ्या 'ते तिघे आणि ती' या कथेंतील राधाकाकींच्या खिन्न चेहऱ्याची आठवण करा! 'धन्य माउली!' ही कविता आणि 'मालविलास दिवा' हीहि, बोरकरांच्या कवितेवरून सुचल्या आहेत. दोघांच्याहि त्या त्या कवितांत पृथगात्मकता आहे. 'आकाश माउलीस' आणि 'लाव दिवा ग लाव दिवा' या बोरकरांच्या दोन कविता पहा.

माझ्या कवितांपैकीं 'दुपार', 'ज्वार', 'लहर' 'त्या घराची वाट', 'नेस नवी साडी' 'शापित सुर हे', 'नवें वर्ष', 'राहुटी' इत्यादि कविता मला फार आवडतात. मी एकटा असलों म्हणजे ह्यांचें मनोमन आवर्तन चालतें.

माझ्या नव्या जागेचा पगार पहिल्यांदाच आज माझ्या हातीं पडला. माझा भाऊहि गेल्या महिन्यांत बदलून येथें आला आहे. आर्थिक दृष्ट्या आतां उणीवा अशा मुळींच उरणार नाहींत. मग हवीं तीं पुस्तकें मागवितां येतील आणि हव्या त्या मासिकाचे वर्गणीदार होतां येईल. पण

वाङ्मयीन जीवनाचा विचार करतांना मात्र निराशेचेंच पारडें जड होत चाललें आहे. परवाच आत्मवृत्तात्मक लेख लिहिल्यापासून आणखी असें कांहीं लिहिलें तर आपली पूर्वीची संवय चालू ठेवतां येईल; असा विचार आल्याशिवाय राहिला नाही. कांहीं तास हुरूपहि वाटला आणि आजाराचें दडपण असूनहि मन फार टंच राहिलें. विचार आले तसे लिहिले. सर्वच विचारांचें संकलन पत्रांत नीट झालेलें नाहीं. उरलेले विचार पुढील पत्रीं लिहीन. कवितेची वही आणि कवितांवरील आपलें पत्र दहा-बारा दिवसांनी यावें.

लोभ असावा,

बा. सी. मर्ढेकर

पुन्हां

नभाच्या

लाल कडा

**– बी. रघुनाथ**

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. इ
क्रमांक ९८२४८ वि. ३/०
क्रमांक ९३७८ नोंद दि ३/
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ८०९९

## पश्चिमे तुझें नभ...!

पश्चिमे, तुझें नभ काजळलें !
क्षीण रवीचा दिवाहि विझला मुगुटमणी नच पाजळलें !

विध्वंसाचीं मुखिं मुखचूर्णें
ओठांवरती रक्त रोगणें
प्रसाधनीं या उन्मादाने
चुंबिलेस हुळहुळे कोंवळे रक्त तयांचें सांकळलें

असें प्रीतिचें चाखुनिया सुख
अध्यात्माची लागे रुखरुख
तात्त्विक झाली जळजळ वखवख
शब्दरंगिं जे सहज रंगले अंगसंगिं पुरते जळले

सखे, निकटचे फुकटे कोणी
विकत ओढिला मृत्यु तयांनी
एका बसवुनि आतुर शयनीं
अभिसाराचें वचन दुज्याला असेंच जग त्वां चाळविलें

एक

उन्मादीं नच आज उभरपण
नुरला नखरा, नुरें निबरपण
सरलें यौवन  सरलें जीवन
आंधळयासही तुझें नाटकी रंगित इंगित आकळलें

वृथा धुक्याचें पांघरशी थर
झांकितील तुज धरा न सागर
तपच गाजविल राज्य जगावर
अपूर्व एकच 'पूर्व' यापुढे तेज तिचें बघ झळझळलें

# रंगाऱ्याचें गाणें

रंगरंजने, तुझ्या साडिला देउं कोणता रंग ?

लाल गुलाबी भडक–कोंवळे
उषेनिशेने मचूळ केले,

या रंगांनी काय खुलावे तुझ्या नवतिचे ढंग ?

झुब अशी देईन सांवळी,
तनुची राका पीत रसाळी –

सळसळेल सखि, रात, तिचे पण क्षयीच रंगप्रसंग !

मूर्तिमंत तूं श्रावण राणी
धरा हांसते तुझ्या भरांनी

कशास हिरवी मग नवलाई पानझडींनी खंग ?

जर्द, बसंती, गर्द गाभुळे
दाणखडांचे मुके चोचले

हे न तुझे सखि, रंग, हिसळतो यांतुनि क्षुब्ध अनंग !

रंगाच्या घरिं भरल्या नांदी
तूं– मी ज्यांचे जरा न नादी

अंतरंगिच्या रंगसंगतिंत राहुंत सजणी, दंग !

लहर लहरली ग ऽ
रतिनयनांतुन समागमाची धुंदिल धून लहरली ग !

चला शिंपडा गुलाबपाणी
दिवे अत्तराचे उजळा कुणि
नवीच मुसमुस गालीं गात्रीं आज हिच्या मोहरली ग !

होती जोंवर ही रुसलेली
प्रभाच नव्हती प्रभेंत उरली,
हिच्या रोमरोमांतुन आतां मस्त कस्तुरी झरली ग !

नवस करा वा फेडा कोणी,
विनवण्या न मानील मानिनी
स्वयंतरंगीं रंगरमा ही अंगोपांग डवरली ग !

नाजुक, सूक्ष्मच हिचिया चाली
हिची न कळते कुणास बोली
चित्कलाच ही चित्तचंद्रिका हिच्यापुढें मति हरली ग !

करा ध्यान वा गा गुणगायन
अमर कराया हा प्रसादक्षण
कामधेनु ही मनोजीवना निब्बर कास सरसरली ग !

# नेस नवी साडी

नेस नवी साडी
उकल घड्या, होइ आड
लोटुनि अर्धें कवाड
जागवि या डोळयांच्या
आज जुन्या खोडी
प्रगटगूढ पदर निऱ्या
करितिल वृत्ती गहिऱ्या,
नाभिकमलिं गुंफि कमल
कमला कर जोडी
केतकिचा गर्भगंध
तलम खुलवितिल प्रबंध
कटिस्कंधीं सळसळतां
नवतेची गोडी
कुतुकें शेजारिणिचीं
रंगांचीं शोभेचीं,
लचक जरा झांकुनि क्षण
प्रौढ ही उफाडी
मंदिरिंच्या मूर्तींनो
सुभग सुखद पूर्तींनो
ह्या तुमचे बघुनि रूप
आणि अंगमोडी

# उन्हांत बसली न्हात

उन्हांत बसली न्हात
दुपारचा एकान्त मोकळा
उघड्या आडोश्यांत !

झोंपडिची वाकडी साउली
भुलुनि भुईवर जरा थबकली,
अनिमिष नयनीं जलवेषांतिल
ठरली चिल पहात

बारामासी जणु फुलमाळिण
फुलें थांबली ताजीं घेउन,
पिवळ्या शेवंतिची नव्हाळी
भरित अंगभंगांत

एक थवा कोंग्यांचा कुठला
जवळ बाभळीवरी थांबला
एकसुराने या राणीचें
मंगल न्हाणें गात

सरत्या हेमन्तांतिल वारें
गार,ऊन अन् जरा बावरे
स्वप्न सुगीचें कणसावर या
लहेरे काय दंवांत !

पलिकडच्या पाहते मळ्यांतुन
आंबराइ क्षण मान उंचवुन
बिंब वसंताचें का झळके
दिवसाच्या ऐन्यांत

## झाली संध्याकाळ –

झाली संध्याकाळ!
वीरांनो, रण अतां थांबवा
विद्ध रथीं शत्रुचे गौरवा
रात–रमा गुंफिते सुरंगी सांध्यघनांची माळ!
परते गोरज ललकारींनी
रथ पार्थाचा कुरुभूमीहुनि
श्रीकृष्णाचें सफल हेतुस्मित वागवितें आभाळ!
करुद्ध तपोधन दिन वणवणला
अन्तस्तेजीं धगला शिणला
क्षीण लोचनीं स्वप्न उद्यांचें रमे लाल तेजाळ!
पडले झेलित खड्ग बलींचें
राजपथीं अभिमन्यु आजचे
त्या मरणाच्या कथा घरोघर असाच उठविति जाळ!
नीलयौवना सुभगशालिनी
मुग्ध उभी जणुं आत्मदर्शनीं
गूढ कळे, होणार नवतिचा अंचळ सफल रसाळ!
येइल आतां कान्त घराला
स्फुरे रमणिचा डावा डोळा
आठवितो पांथस्थ गवाक्षांतलें वदन घोसाळ!

जाळूनि लालसा सुखभोगांची अरुणी
आकाश उजळिलें चूड कुडीची करुनी
हे प्रभावपूजक फिरति काजव्याभोंतीं
काळोख ओढुनी बसतों तोंडावरती.

× × ×

येतांच पल तें ओळखिच्या रंगाचें
वाहूनि आणि जें अंतर जड विरहिणिचें
लोचनीं घनांची क्षणांत दाटी झाली
अक्षरें कुणाच्या नकळे अश्रुंत मिटलीं.

× × ×

फेंकितो महालीं रमण सखीच्या शेला
जो मावळतीच्या चुकुनि अंगणीं पडला
ही लाल चहाडी राजमंदिरीं नेली
चोरास पहाया सजल्या लाख मशाली !

× × ×

फटफटतां, भिंतिंतुनि लगबग शयनीं उठुनी
छायांचें सांवरि वसन कुलवती रजनी
पण निशे वाटतें अजुनि पहाट न झाली
ही असेल जाग्या सखिनेत्रांतिल लाली.

# वियोगांतल्या रात्रीं

वियोगांतल्या रात्रीं सजणी, योग रात्रिचे आठव ग !
तम प्रवाहांतुनी स्मृतींचीं दलें दीप्तियुत पाठव ग

होइल संध्याकाळ निवळवित
निदाघघन निज स्पर्शानें
प्रौढपणांतिल संयत सालस
तुझींच घेउनि आभरणें !

मित्रांच्या मेळ्यांत कोंवळी
रात्र जरा करमवून ग !
घरां परत येईन, मनाला
ओढ गोड तव लावुन ग !

सजवुनि साजुक पाक गुणांनीं
ठेव ओसरीवर थाळी
रसार्थ माझी मीहि ठेवितों
क्षुधा अशान्तच या काळीं !

अंग टाकितां शयनिं, येउंदे
श्रांत जांभई हिसमुसुनी,
निळें गर्द आभाळहि तिकडे
धांवत जाइल येथोनी !
दिवा सारुनी शयनगृहींचा होय मनोमन जवळीं ग !
रातहि जागत पाहिल अपुली वियोगरात निराळी ग !

## पानझड

पानझडी ! पानझडी !
सुरू जाहल्या पानझडी !
हुडहुडींत हीं उसनीं विभवें
प्राणहीन पडतिल उघडीं !

नट मोहर वटराज जटिल कुणि
बसोत आकाशीं टक लावुनि
शतकांची अढळता एक ती
झडप क्षणीं पाडिल उपडी !

विविध घनांच्या राखुनि सेना
होते कोणी करित गर्जना
वातचक्र दिसलें न तोंवरी,
आतां घेतिल कुठे दडी ?

पुटें हिमांची झटकुन उठलीं
चहूंकडुन एकच बंडाळी
दुबळे ज्यांनी पायिं चिरडिले
त्यांची आली अतां घडी !

चिरतिल चिरु द्या गळे कुणाचे
जळतिल जळुं द्या मळे कुणाचे
वसंत नाहीं विनाझोडल्या
रोखतील जे वाट, घडी !

## रस्ता नागर झाला

फिरल्या वेधित प्रथम दुर्बिणी,
पडझड कोठे, नवी बांधणी,
हात जाहले कितीक ओले
जमवित मालमसाला

स्तंभ दिव्यांचे समांतराने
पथीं रोविले आधुनिकाने
पण नगरांतिल रात्र निराळी
ठाउक काय दिसाला ?

गणवेषांतील पिळे मिशांचे
वाहक रक्षक सुशासनाचे !
रक्षित पथ तरि खिसेकापुंच्या
येई बहर यशाला

सजणी !
ज्वार आणिली ज्वार

श्रमास माझ्या अहा मनोहर
  हाच सुमनसंभार
तुझ्या गुणांचा तीवर व्हावा
  गे, रसमय संस्कार
पाखड यांतिल खडे भराभर
  निवड सार निःसार
वरणें घालुनि मुखिं जात्याच्या
  ओव्या म्हण गे, चार
स्वर्णसिद्ध निजकरिं घरकरिणी,
  काढ पीठ कसदार
या काष्ठांना दाव झडकरी
  स्वप्नें ज्वालाकार
सिद्ध करी गे, रुचकर त्यावर
  प्राणधारणाधार
करूंत मिळुनी सेवुनि अपुला
  अमृतमय सहकार
यामुळेच गे, प्रकाश दिवसां
  रत्नखचित अंधार

# कशाला मुखीं पुन्हां तांबूल ?

कशाला मुखीं पुन्हां तांबूल ?
गुलाब शोधित झुरूनि मेले कांट्यावर बुलबूल.

पदर सरळ तरि भांग वांकडा
चारजणींचा तसा न मुखडा
खडा न टाकिल कोण चोरटी बघुनि हूल चाहूल !

सरळ सोंवळ्या शुकसनकांना
पापणिचा पडतांच उखाणा
उकलतांच होतील गुंतुनी ते आकुल व्याकूल !

खळीजवळ लसलसें गोंदलें,
विषार मादक पिउनि तेथले —
मदनाचें का जळतां काळिज उरलें निळें डहूळ !

कुठुनि निघाली कुठे संपली
मुरड एक अशि क्षणैक स्फुरली
सभा पडे घायाळ भुईवर भरुनि मधुर उरिं शूल !

आग अग्निपुटिं चुना जाहला
पानांसह त्वां 'लाल'स केला,
विषें विविध पचवूनहि शोभसि मोहक हंसरें फूल.

# तुजवरि लिहितों कविता सजणी!

तुजवरि लिहितों कविता सजणी.
तरल तुझे सहकंप शोधितों
खोल मनांतिल कळ झंकारुनि.

शब्द आठवित त्रुटित भेटिंतिल
विश्व उकलितों निःशब्दांतिल;
तिरपे इक्संकेत विद्ध या —
मनांत मुरवित सलत ठेवुनी.

तींच चिंतनें पुन्हां चेतवुन
प्रतीक्षेंत पळ पळास जोडुन;
क्षुब्ध कोंदल्या स्तब्धतेस या
तुझ्या चाहुलिंत जरा चाळवुनि.

उत्कंठांचें मोहळ नयनीं,
वसंत वसनीं, वसंत श्वसनीं;
तुझ्या अशा बिंबास्तव कलतीं—
उन्हें सरकलीं खिन्न होउनी.

कृष्ण कमळ जणुं रात उमलली
प्रीत आपुली तिलाहि कळली!
कोमल तमतंतूंनी बघते
अपुलें तुटलें अंतर जुळवुनि.

नवदा

एक पाय तव दारिं निघाया
ओढ नेत्रिं पण परत यावया,
अर्धेपणिं या अडुनि राहिलीं
गोलार्धावर दिवसयामिनी.

दिवा जळे मम व्यथा घेउनी,
असशिल जागीं तूंही शयनीं;
पराग मिटल्या अनुरागाचे
उसाशांत वेंचुनी गुफुंनी.

ये आजहि ये परत जायला
अर्धे गीतच फिरुनि गायला,
तुझिया शब्दाखातर फिरतों
जागेपण स्वप्नांत घेउनी.

# आंधळी

अरे, त्या आंधळीस कुणि सांगा
सहवासाला निवड म्हणावें
सुचरित सुंदर चांगा.

गुणांत ज्यांच्या निर्गुणभूषित,
श्रमांत ज्यांच्या विश्व प्रकाशित,
शब्द जयांचे सहज सुभाषित,
असतें खुललें सुयश तयांचें
हिचिया रंग प्रसंगा.

पराक्रमाचीं बिरुदें इकडे,
प्रेरक प्रतिभेचे त्या तिकडे,
प्रीतीचे पाईक पलिकडे,
अलंकार हे अलंकृतीचे,
दिसति न तिज या रांगा ?

हिचे अनामिक कुणी कंठमणि
अनुचित रमविति रात्र चांदणी
अशी कशी ही कळे न रमणी !
महालांत घेऊन बैसली
अरसिक दुर्मुख बांगा.

दर्पणा

तिच्या तुज ठाउक खाणाखुणा.

सुरचित सुंदर कबरीबंधन
मुक्त होय मन्मनास बांधुन
तुझी कला कीं तिचा सहजगुण ?
कुरल कुटिल त्या उकल–गुंतिचा
तुला कशाला रे चवणा ?

स्नात मनोज्ञा दिसावया ती
उभ्या आड संस्कृतिच्या भिंती
कड्याकवाडें नेत्र रोधितीं
तुला मात्र बाजार खुला तो
कळे का न तिज दिसतें ना ?

गांठ जिथे पडते हृदयांची
गांठ तुझ्या ती तर ओळखिची
पदर आडवा अम्हांस जाची
असभ्य साऱ्या तुझिया लीला
सभ्य मानिते कुलांगना.

भक्त रसिक मी तिचा प्रेमधन
विविध तिचें मजसाठि प्रसाधन,
मी मानव, नच मनोज्ञ तुजसम
तूं मात्र हुबेहुब अंगरंग ते
पाहुनि होशी तन्मय ना !

## पांढऱ्या पऱ्या

पांढऱ्या पऱ्या या.
नटचंचल, रसमंथर
मुग्ध नाचऱ्या या.

रौप्यसितस्मित वदनीं
छुळछुळ छुमछुम चरणीं
वाण्यांच्या राण्यांच्या
रमणि, सोयऱ्या या.

तरल चपल अंगभंग
निःसंगच रंगसंग
वामनेत्रिं सोन्याचा
ताजवा लवे या.

उघड्यांना लाजतील
लज्जेला उकलितील,
कधि दलाल, कधि कलाल
वरिति बावऱ्या या.

पाडितील मुगुट कुठे
रमतिल पाहुनि घरटें,
शांत भूमिगत केंव्हा
मुखर छोकऱ्या या.

बंदिगृहिं येतिल्ही
बंदिगृहिं नेतिल्ही
निष्कलंक तरि छचोर
कुलिन चटकुऱ्या या.

जीवन रस—वाहिन्याच
वेद सर्व आज ह्याच
युगभंजक युगरंजक
कृष्ण चंद्ऱ्या या.

नशिबाचे खट आम्ही
लभ्य न या अमित श्रमीं
ओढिति जे बलि त्यांच्या
उघड नोवऱ्या या.

## अन्नदेवा

अहो अन्नदेवा, आज देवपणा असा कसा?

आषाढांनी शोभविलीं
दसरा नि दीपावली
आणि पुसांनी पाहिली
काळी हिरवी कोंवळी
शासनानें मात्र नेला
सुगीचा हो भरवंसा!

अहो अन्नदेवा, आज देवपणा असा कसा?

काय पेव कणग्यांची
नाही झाली आठवण?
गोदामांत छदामांची
मोहवीते छन छन
करोनियां डोळेझाक
अंधाराचा आडवसा

धुलाऊचा चलाऊचा मात्र भरवितां खिसा!

आलें नियंत्रण, झाला
नियंत्रित क्रयक्रम
माणसांच्या मोहळानें
भरें दुकान दुकान
अभावांत याचकांना
लाभलांत पसा पसा

मात्र अन्नपूर्णा घरीं मेल्या पाखडून भुसा!

# रे ओल्या काष्ठा

रे ओल्या काष्ठा, पेट.

कडकडलेल्या विजा झेलुनी
कृतार्थ पडले किति उन्मळुनी
धूम जाहले ब्रह्मकारणीं
युगांतराने तुला लाभते आज अग्निची भेट.

अस्थि कितींच्या समिधा झाल्या
ऊर करिति कुणि धुन्या धुमसल्या
जडतेच्या कावडी वाहिल्या
आत्मज्वलनांतुनि कितिकांनी त्या पोचविल्या थेट.

द्यावीं तुज कशिं कितीं चेतनें
तुझें सरेना परि धुसफुसणें
हें का जळणें ? धुराड भरणें.
ये न पुरवितां तुजला केवळ पोटजाळिचें नेट.

## घन गरजे ऽ

साजण ऽ माडिचा चढे जिना;
कशि नीट नेटकी दिसूं
कोणता घालूं तरि दागिना ?

आणित होत्या नाटकशाळा
फेस रातभर रंग रसाला
एकटिचा माझाच दुशाला
मी ओढित होते पुन्हापुन्हा.

वसंतउटि तगमगींत सुकली
रिती रात अंगास न पुरली
आज अकस्मित सांज ढगाळी
ये जुन्या जागवावया खुणा.

तीच चाल जींतून अनावर
प्राणधनाचें कळतें अंतर
रोधितील तरि कसे निमिषभर
हे बाहुबंध निर्बंध मना !

पळा दासिंनो, आड आतां गे
रंजन विंझण क्षणही नलगे
दार थडथडे कुणि उघडा गे,
गरजतो काय घन रिताच ना ?

# वर्ष नवें

वर्ष नवें! वर्ष नवें!
या वर्षी हर्ष नवे
या हर्षी दर्श नवे
या वर्षी स्पर्श नवे
या वर्षी सूर नवे
या वर्षी पूर नवे
या वर्षी घोस नवे
या वर्षी जोस नवे
या वर्षी गांव नवें
या वर्षी नांव नवें
या वर्षी देव नवे
या वर्षी भाव नवे
या वर्षी पर्व नवें
या वर्षी गर्व नवे
या वर्षी सर्व नवें
नवता नाविन्य नवें!

✤ ✤

या वर्षी मीहि नवा
माझा थकला थकवा
गळलेल्या गात्रांतुन
भरलें जुळवुन चेतन
हांसो हांसेल काळ
माझें हंसु मात्र नवें!
ओसरिवर किणकिणती
श्रमसुस्वर गृहगीती
सुप्रसाद संकल्पीं
मन्मानसकल्प लवे.
रे, माझ्या आनंदा
नवसुंदर तालछंद
सुहृदांच्या संसारीं
घुमवी नव मधुर रवें.

# तें न तिनें कधि ओळखलें

तें न तिने कधिं ओळखिलें.

दिलें उशाला काळिज ठेउन
स्पंदनांत पण तें दुखलें.

हिरमुसलेली विहिरीकांठीं
विहिरिंत पडल्या पोहऱ्यासाठीं
भेट प्रथम ही; घटांतून मग
तिनें हिसळावित चालविलें.

पथांत शोधित तिचीं पाउलें
फिरत राहिलों देवदेवळें
माग घेत कधिं कधिं मार्गावर
पथदीपापरि मन जळलें.

आम्ल फळांस्तव आसुसलेली
तिची अडाणी वृत्ति न रुचली,
मधुर फळांचे भावधर्मरस
तिज दाखविले, चाखविले.

कधिं यात्रेच्या गर्दीमधुनी
तिची टाकिली वाट चुकवुनी,
बावरल्या हरणीस मनोगत
स्पर्शजलांतुनि कळवियलें !

सामसूमल्या अपरात्रींतुन
टिचकविलें हलु दार बाहिरुन;
होते जेंव्हा परस्परांच्या
पिसांत पंछी शहारले.

आवड पाहुनि तिची फुलांची
फुलांत यौवन सजवायाची;
आज तिच्या वाटेवर अंतर
कांट्यावरती आंथरलें.

# मुद्रिका

जळतसे दिव्यासह शयनमंदिरीं नवती
रति धनेश्वराची कुण्या बायको चवथी
परि परंपरेची कुलीन बाहिर–ख्याली
संपदेस व्हावी विस्मृत कां कधिंकाळीं ?

जोसात नाचते सुकी जवानी जेथें
बेहोष पहावे राव रातभर तेथें
मन रमे नित्य नवनवीन मुखड्यावरती
ना 'आडघरा'चे विडेहि केव्हां चुकती !

घरिं किशी कुळंबिणं तृप्त खरकट्यावरती
धड नेसुं न, कां धरतिलाहि झांके भरती ?
फिरतांच हात तें सदन सुनिर्मळ व्हावें !
अन् काजळलेले दीप उजळ झळकावे !

ह्या जवळ पाहुनी शरीर सावळा डौल
जाहलें धन्याचें चित्त विचल ओढाळ.

✣ ✣ ✣

एकदां धन्याची तिला मुद्रिका दिसली
भावूक मुलीची नजर तिच्यावर खिळली
स्वर्णांत खुले तो लाल खडा जडलेला;
कुणि चुकुन तपस्वी 'सुवर्णां'त वा रमला !

नव्हतीच मुद्रिका ही तर त्या जातीची–
काळजी जियेला वनवासी प्रीतीची.
आधींच किशी उजविल्या घरांतुन उठली
मग हौस कशाची आभरणांची फिटली ?

वाटलें हवें तें भूषण अपुल्या हातीं
ती जातां येतां पाहत राही कान्ती,
धनराज समजले लुब्ध सुंदरा झाली
पाहुनी समय कळ मनांतली सांगितली.

ती भ्याली, रडली अनघ कोवळी बाला
घरधनीण प्रेमळ धीर देतसे तिजला,
ऐश्वर्य, संपदा, शद्ब फळां नच आला
राहिला किशीवर नाग चिडुनि दडलेला.

* * *

तें भूषण तिजला स्नानगृहामधिं दिसलें
घरधनी कुणाच्या चिंतनिं विसरुनि गेले ?
उचललें, निरखिलें, जडविलेंहि बोटांत
रांगडा दिसे जणुं राजरतीचा हात !

फिरणार द्यावया परत त्यास तें ज्याचें
तों शब्द येति सप्रहार श्रीमंताचे—
"चोरटे, नीघ येथून–" हृदय हादरलें
भलभलते आणिक गुन्हे ऐकणें आले.

बोभाटा नसता तिचा गांवभर झाला;
दिसली न किशी मग कुठें पुन्हा कवणाला.

* * *

अपरात्र, सामसुम, मात्र आडवळणांत
साथीवर नाचे 'केसरबाला' गात.
झोकांत तिथें हे धनकोजी बसलेले,
नाटकी मदाचे कटाक्ष हृदयीं रुतले.

नृत्योत्सव सरतां चालतसे मनधरणी !
लाखेहि रातभर सिद्ध हात जोडोनी !
कितिकांना लुटले विद्ध कितिक घोळविले,
परतले कितिक तरि रिते, कितिक पोळविले.

लाचार राव हे म्हणती–"केसरराणी,
किति दिवस आणखी सांग भरावें पाणी ?
मी दास तुझा, तूं स्वामिनि सर्वस्वाची
होणार कृपा कधिं तुझिया अनुरागाची ?"

काढुनी मुद्रिका तिची करांगुलि धरुनी
म्हणतसे–"घेइ हें प्रेमचिन्ह पारखुनी."
घेतली, पाहिली गणिका गद्गद हंसली
कुणि कथा किशीची कां तिजला सांगितली !

* * *

केसरचा झाला कळलें अवचित खून
पोलीस, पंच, कायदे सिद्ध होऊन—
शोधितां मुद्रिका निकट तिच्या आढळली
धनि खुनी हिचा, न्यायास कल्पना आली.

तें कळूनि आलें भूषण धनराजाचें
पाचारण झालें त्यास न्यायदेवांचें.
"छे! भूषण असलें हीन कोण वागविल?
गणिकेसह कां कुणि कुलिन शील मळवील?"

गरजले यापरी वकिल, पुरावे पटले.
तें मिटलें लफडें आणि धनेश्वर सुटले.

✤ ✤ ✤

किशी कुळंबिणीला जें न लाभते झालें
सौंदर्य—खणी केसरला जें नच पचलें
"माझेंच" म्हणाया ज्यास न धनिपण धजलें
सत्तेस असें तें दूषण भूषण झालें!

अशी आपुली प्रेमकहाणी !—
घेऊनि मधुघट मनोगतांचे
फिरलों पाहत तळ स्वप्नांचे.
जिथें व्हायचें मीलन अपुलें
सुरू जाहला वियोग तेथुन.
उरलों शापित खगयुगुलासम—
विरहि निरंतर सन्निध असुनी.

× × ×

तिथें पूर्णतेंत त्वां फुलावें
हेलावुनि मी इथें उलावें !
असीमतेच्या कुण्या तटावर
पूर्णिमेस हा मिळेल सागर ?
दिशा न उरल्या फिरावयाच्या
दुरूनि घेतों व्यथा बघोनी.

× × ×

प्रभाच माझी प्रीत साजणी,
विश्वदाहशम तुझ्या लोचनीं.
क्षितिज दिसेना कुठें उजळलें—
जुळतिल जेथें मार्ग निराळे,
रात जागते दिवे जाळुनी
दिवस राहिला जळत दंवांनीं !

# नगरभवानी

आली रे, नगरभवानी
व्यथा पदरिं तरि निघे पथांतुनि गुंगत रंगीत गाणीं.

तंग पतंगी काचोळीवर
अंचळ उच्छृंखल पतनातुर
अजून पहिल्या हिवाळयांतला गहूं—हरबरा रानीं.

अहो, पथांतिल रसिकराज कुणि
सरा जरा बाजुला पाहुनी,
ना तर होइल मनोमृगाची तहान आग दंवांनी.

कुणी मानधन, हिला न हटका,
धुवटपणा दिवसाचा लटका,
हिच्या नयन कज्जलांत तुमच्या असतिल रात्री लपुनी.

आंबट ओळख सुकी कुणाची,
मुकी कुणाची भूक फुकाची,
अभिलाषेबर कितीक आले प्रयाग—काशी करुनी.
रे वाण्या, सांभाळ ताजवा,
लवला पाही डोळा डावा,
दिवसा लावुनि दिवा दुकानीं जाशिल गांव त्यजोनी.

# कवि आणि दीपक

कवि—स्वभाव ज्या नारिचा जाळणें—
भरांत जळशी तिच्या मंदिरीं
भाग भागले भ्रमच दीपका !
रूपरसा नच लुब्ध तुजवरी.

एकरात्र येणार खरोखर
विखरित सुषमा सुमशय्येवर
नको मीलनीं साक्ष म्हणोनी—
अधिर लाजरी बसेल फुंकर !

सुंदरतेच्या ध्यानीं निष्फळ
ऊर जाळुनी उरेल काजळ !

दीपक—जळत जागशी रचित गात वा
मनोरमेवरि गीत मनोरम,
मला तरी सान्निध्य सखीचें
तुजला केवळ स्वप्न समागम.

काजळ माझें मज का लांछन ?
ज्वलनस्मृति मंदिरीं वागविल,
प्रसाधनीं कधि नयनीं रमुनी
हक्शर दाहक भेदक पराजिल.

दग्ध् जरी मी विदग्ध राहुन
रूप सखीचें खुलविन—सेविन !

# त्या घराची वाट

काशि रुळत सरळ त्या पळे घराला वाट!

घनस्नेह उंबरठा उकली
गर्द रज्जु पथ विणी पाउलीं
या दाराची त्या दाराला
जोडी रेशिमगांठ.

मार्गीं डोळे असतिल खिळले
आतुर अंतर उसळे हिसळे
पुढें पळे ही चपळ त्याहुनी
उधळि उडवि फुंफाट.

रम्य नगरिच्या रम्य हवेल्या
दो बाजूंनी उभ्या ठाकल्या
मंगल जीवन चिन्हविभूषित
हे जणुं ठरले भाट.

सांध्यरंग शुभ पूर्णच सुंदर
अंतराळिंच्या सिद्धि अगोचर
सहर्ष उधळिति क्षणांतराचा
धरुनी अंतरपाट.

वक्र विनोदें वळणीं होउनि
अनुचारास्तव पायिं बिलगुनी
दिला हिने या नयनां गवसुनि
अखेर काजळकांठ.

# दिसांनो, निशांनो...

दिसांनो, निशांनो,
सुखाचींच स्वप्नें तुम्हीं पाहतां.

असें रम्य कुंकुम् रमे भाग्य जेथे
मनोपांखिंना होय आकाश कोतें
उषा दग्ध द्वेषानलीं कां न व्हावी
सुखाची न त्यां साधली चारुता.

तेजोमतीची जराची झळाळी
प्रभा कोणती या प्रभेची निराळी?
निशे, लोचनीं थांबशी रंगशी ना
दिशाचीं फुलें वेचितां वेचितां.

हसें वा उसासे तसे लेउनीही
नभाचें निळें सोंग निःसंग राही
घनांनो, फुके हे रसावेश सारे
मिठींची न ठावी तुम्हां गाढता.

## दुपार

कलकलते ही दुपार
तृषिता जणुं प्राशितसे तापलें विखार.

काय विलक्षण काया
ठरति न स्कंधीं छाया!
नग्न पुरी अनला करि मध्यनभिं विहार.

दिसतें त्याला न पार
आरपार एक धार
झुळकांना गिळित फुले धूळिचें निखार.

पाणवठा करुनि निकट
ठाके वट अचल विकट
चाटाया ओठ लवे विहिरीचे गार.

उघड्या मार्गी उघडा
फोडि खडी हातोडा
श्रम कवणास्तव गुंफिति मोत्यांचा हार?

वाळ्याच्या पडद्यांनी
थंड रुचिर पेयांनी
धनिक करिति गणिकांच्या सुरतिचा विचार.

या कवलाराखालीं
धड ऊन न, नच साउलि,
'जीर्ण पांढरे' करिती हाडांचा क्षार.

# देखियला चल एक हिमाचल

देखियला चल एक हिमाचल
पसरवीत गंगौघ दिशांतुन
दक्षिण सिंधू दुजा असा कीं
उठवि वादळें हुंकारांतुन.

उभा प्रलय घनिं शांत संयमित
करांगुलीवर गगन सावरुन
दानवास परि देव न कळला
मानवास नच मनु आकळला !

# मुलीस आला राग

मुलीस आला राग
काय नवल आगींत लागला
फुलवयाला बाग!

डिवऱ्या झाल्या निळ्या बाहुल्या
गालीं निटिलीं झिपऱ्या सुटल्या
फूं फूं करि जणुं फणा काढुनी
गोड विषाचा नाग.

प्रबुद्ध ज्ञानार्जनांत शिणले
त्याग तपांना योगि न पुरले
योग नवा हा हवे तयांचा
दाक्षायणि वैताग.

येइ उन्हा, ही घेइ रम्यता
ही लोभस ने घना क्षुब्धता
कोमल होउनि क्रोध इथें ये
वेंचायास पराग.

## हा ऋतु निराळा

हा ऋतू निराळा !
आगीवर यांकि चुळा लाल पावसाळा.

एक खड्गबद्धहस्त
शांति सुचवि हृदयस्थित
एक नयन अश्रुभरित
दुसऱ्या मधिं ज्वाळा.

ठायिं ठायिं घनगर्जित
ज्यास तालही न रीत
रुद्ध गीत जणुं फोडित
कंठ अंतराळा.

ओस पुन्हा गांव वसे
दुःख रुधिर पिउनि हंसे
कवट्यांचा तवर दिसे
मस्त नव्हाळीला.

# सांज

गाउलीच्या पावलांत
सांज घरा आली.
तुंबलेल्या आंचळांत
सांज भरा आली.

आतुरल्या हंबराचा
सांज कान झाली.
शिणलेल्या डोळुल्यांचा
सांज प्राण झाली.

माउलीच्या वातींतून
सांज तेज ल्याली.
माउलीच्या गीतांतून
सांज भाव प्याली.

माउलीच्या अंकावर
सांज फूल झाली.
फुलासाठीं निदसुरी
सांज भूल झाली.

वहिनीच्या हातांतून
सांज सुधा झाली.
वहिनीच्या हातासाठी
सांज क्षुधा झाली.

वहिनीच्या मुखासाठी
सांज चंद्र झाली.
वहिनीच्या सुखासाठी
सांज मंद्र झाली.

# राव अधिकारी झाले

राव अधिकारी झाले
भलें जगाचें करीत
श्रम न्हाती सोनियांत
खुळे म्हणतात इथें
लांचलुचपत चाले.

अपशब्दांनींच केली
भाषा भोंगळ ओंगळ
निंदकाच्या जिभलीला
हाड नाही हो राहिले.

श्रमाचा कामाचा शीण
अंगिं भेर रात्रंदिन
खुळे म्हणतात कुणी
राव मद्यांत झिंगले.

# हें माझें घर

हें माझें घर.   हें माझें घर.

सहजसिद्ध माउलीच्या वाती
गृहीं मंदिरीं होती दीप्ती
अग्निदेव राबतात हातीं
अन्नब्रह्म रसरुचिचा घे वर.

बहिणाबाई माय धाकुली
भाग्यतिलक निज उजळूं सजली
समजा सोडुनि क्षितिजें आलीं
प्रभात प्रतिदिनिं या ओसरिवर.

हूड आज जरि भाउ सानुला
खचित करिल हा उणें भानुला
मुखिं ह्याच्या दिसताहे रमला
दिवस उद्यांचा सुखकर सुंदर.

उणें जिथें पूर्णत्वा पाही
रमाच सदनांतली श्रमाई
निरपेक्षांचे सुगंध वाही
संस्कृतिचा जागवितें मोहर.

आज रात्र मोठी;
होती जी गांठीविण बद्ध नयनिं ओठीं.

लज्जेविण नव्हति साक्ष
आज खुलें हें गवाक्ष
नीलाक्षी, त्यांत पुन्हां
अक्ष कोटि कोटी.

कीं मांजरि कृष्णनिळी
टक लावुनि टपलेली
आटविल्या दुग्धाची
प्यावयास वाटी.

चावट चाळाहि त्यांत
वेडविते खुळखुळवित
नीरव निज कंठांतिल
टिकल्यांची घाटी.

गे यामिनि, मुक्तकेश
विरहिणिला हिणवितेस
मीलन नच तुजलाही
पडशिल उफराटी.

## धुराड

एक गिरणीचें जागलें धुराड.

आंवती भंवती
निंब बाभळींचे
उंच पर्णहीन
उभे सांगाडे;
बाजूस वस्तींचा
जवळ शेवट;
उत्तरेला निळ्या डोंगराचा तट;
इकडे बघावी काळी नांगरटी.
पूर्वेचा सहज कांठ वेधी दिठी
मोकळी निळी वरती उघाड !
म्हणे "विश्व नवें
श्वासांत निर्मीन;
वितान डोईचें क्षणीं काजळीन"
नव्या चेतनेनें
लागलें भरांत
धूर ओकायाला.
धास्तावलें वारें
सकंप होऊन.
धूर क्षेपांत
लागले रचाया

कारकुनाच्या
लाचार मनानें.
नाहीं फिरकलीं
जवळ पांखरें;

देव आकाशींचे,
काय त्यांचा पाड ?
काय पाहतील
खोलुनी कवाड ?
सूर्यांचाहि गोळा
लागला कलाया
कल्लोळ सांवळा
पाहून, भिऊन.
कशाचा सूर्य ?
असेल ग्लानी या धुराने आली !
नवल न हें !
अहो धडधडे अग्निकुंड जेथें,
आणखी भर तेल पाण्याची;
काय सामर्थ्य,
काय धडगत,
आकाशाच्या एका
पांढऱ्या ग्रहाची ?
नाहीं तेल पाणी,
नाहीं चाक, कळ;
नाहींत साथीला तज्ज्ञ !

आणि कशाचें
निर्मितीचें वेड!

✤ ✤ ✤

झाला अंधार,
श्वास धुराडाचे दृग्विषयांना
झडपित आले.
कशाचा निंब, डोंगर भिंती!
कशाचें विशाल आकाश तरी!
एक चहुंकडे एकधारी तम!
आपलें हें कार्य, आपली निर्मिती,
दर्पांत मस्तींत रमलें धुराड.
मात्र चोरट्या रातवाऱ्याच्या
कानाशीं लागून कुजबुजले
रात्रीचे प्रहर.
झाले फटफट.
जेथे तेथे सारें जसेंच्या तसें.
आकाशाला जरा दिसेना कुठें
ठिपका काळा.
कुठें कांही तरी श्रमांत उणें?
नव्या भरानें पुन्हा चेतलें
वेडें धुराड.

# रात्र संपली तरी

दिवस जागवीत उठे
राउळांतुनी सनई;
रात संपली सरल्या
त्या न रात्रिच्या सयी.

क्षितिजी अरुवार अरुण,
शयनीं जणुं चुळबुळून;
स्पर्शाकुल शिणलेल्या
सोनसळीची झळई.

सत्त्व पहायास काय
धाडिली वसंत रात?
शपथ तुझ्या सुषमेची
दुमडिली दशी न सई.

हें निलाजरें दिवटे
लघळ अजुन जळताहे,
भग्नमना यामिनिची
नाभि स्फुरे या वलयीं.

मद्याहुनि मदिर गहन
स्वप्नाहुनि सहज तरल
रमणी, तव पलकांतिल
नीज इथें, न जाग ही.

खुळी जाहली धूळ!

चाल कुणाची पाहुनि हसते
पाय कुणाचे चुरीत बसते
हसूं कुणाच्या गालांवरचे
मळवी टाकुनि चूळ.

ओठ कपोलीं ठेवुनि स्वप्नीं
कोण कोठला गेला निघुनी
वस्तुवास्तुंना मिठ्या मारिते
वियोगिनी व्याकूळ.

गजबजलेल्या मार्गांवर लोळत
तपार्थ बसते तपांत पोळत
करसुनीच्या नागरनीतिस
निर्मळ काय गढूळ?

नको अशी गे, फिरूं घरोघर
होय जरा या वाऱ्याच्यावर
तुझ्या सख्याचा महाल तेथे
निळा गर्द जांभूळ!

# आज कुणाला गावें ?

आज कुणाला गावें ?

वेश स्वदेशी, घोष सभांतुन
देव देखणे भुललों पाहुन
वरवरचा परि शेंदुर त्यांचा
कसलें स्तवन म्हणावें ?

म्हणत 'महात्मन्' कितिक गरजले
गुण-संकीर्तनिं किति गहिंवरले
दर्प तयांच्या मुखांस भलता
हें कवणा सांगावें ?

शिष्यांत भरतीं चित्रमंदिरें
पडद्यावर गिरगिरति घागरे
त्या सीतांचें सावित्रीचें
काय चरित वर्णावें ?

निःस्पृह पाहुनि केलें वंदन
छुपा खिसा करि त्याचा 'छन् छन्'
सेवेची नच आंच, लांच ती,
कसें तयास पुजावें ?

सन्याशाच्या छाटिंत चोळी
मुमुक्षु फिरतो गल्ली बोळी

विविधरंगी या शुकांबकांमधि
  नितळ कसें निवडावें ?

राउळिं जमतो भाविक मेळा
गुरवाचा गांजावर डोळा
त्यांतहि डोळे किती निराळे
  भक्त कुणा समजावें ?

आदरिली विद्वत्ता दिसतां
विनयाला क्षण वाचा फुटतां
ऐकूं आली द्वेष अहंता
  सुजन कुठे शोधावे ?

बुद्ध युद्धकल्पनांत रमले
शांतिदूत रक्तास भुकेले
भूतदयेच्या स्तनीं लागुनी
  कुठवर विष प्राशावें ?

मीहि एक या कवि जगांतला
माझा मजला मोह न सुटला
पोटामधल्या आगीसाठी
  रचुनि कवन फुंकावें ?

# कलिदूतांनो

दा. क्र. ८६९९

या भरा भरा, ऱ्या रास घरा.

दग्ध उरांच्या धूप धगींचे
भोग भाग नव नरमांसाचे
करुनि फेडिले नवस जयांचे

करपल्या आंतड्यांचा याहि
फुलवरा तयांना करा करा.

तोडित नीरस चर्म तान्हुलें
विवस्त्र सांगाड्यावर थिजलें
भरवसतीमधिं गृध्र विहरले

ताळबंद साळ्यांत नासवुन
चारला घुशींना मोतिचुरा.

अहा! दयेचे मेघ गरजले
बुद्ध युद्धकल्पनांत रमले
प्रलयाचे नरडें खरखरलें

कलिदूतांनो, रक्तमुखांनी
गा शांति–संहिता शुभंकरा.

# एकाकिनी

चालली ही कोण एकाकिनी ?
थबके पाऊल, घेते चाहुल
पाही कुणा वाकुनी ?

घनांधार हे लावित हिसळित
जागजागिं पथदीप पाजळित
पुनवेचा जणु महाल शोधित
निघाली काय स्वयें यामिनी ?

घराघरांतिल कणकण वेंचित
लोक हितैषी अजर अमर पथ
मानवता बैसला जागवित
रात ही कल्पांत का मानुनी ?

चित्रमंदिरीं चित्रमालिका
तुटल्या मिटतां प्रकाशरेखा,
चित्र त्यांतलें एक असे का
झळाळे नील–प्रकाशांतुनी ?

बिटंबिली वा सत्तांधांनी
ग्रामदेवता जाते उठुनी ?
'येतिल तारक आग होउनी'
सांगती छाया पदिं लागुनि.

घरें पलिकडे कामकऱ्यांचीं
नग्न इथे भरनिशा नशेची
विहिर निदानीं माय जियेची
हताशा ही तेथली का कुणी?

कीं धडुत्यांतील कुणी 'घरेली'
शेज निघे उबवाया कुठली
जीवनार्थ; चोरीत साउली
व्यथांना सजवुनि—शृंगारुनी.

घुमती टोले ठाण्यावरुनी
गस्त दूरची पडते कानीं
श्वान भुंकतें कुठे आळितुनि.
कापते मध्यरात्र त्यांतुनि.

अमृताक्षेरं उजवित कविते,
उजळ जिथे तप तेजहि ढळतें,
अशिव जगांतिल हो निवारते
होउनी सजणी कधी संगिनी.

त्रैपत्र

## दग्ध ?

सांगती भले भले
त्वां मजला टाकले.
दूषण तुज लाविती
प्रीत ज्यांस नाकळे.

होतें फसवायचें
मन्मनसुम कां कले,
खुलवाया निवडलें
रम्य जें तुझ्यांतलें !

होती कळ तोंवरी
ज्वलन ठाउक नव्हतें;
आज पतंगा घडे
मीलन दीपकांतलें.

# दुर्मुखली

दुर्मुखली दुर्मुखली,
बसे उगाळित रात्रंदिन ही
एकच रुखरुख कां कसली ?

एकांतित दो प्रहरीं जमुनि
सुखालाप करितात सुवासिनी
जाय हांसुनें घर खुसखुसुनी

फेस न या कोरड्या सागरीं
मनांत शून्यें चघळित बसली.

नवोढ न्हात्या उनाड पोरी,
श्वसनीं रसनीं उरिं ओठावरिं
नवी भरारी, नवी उभारी;

उदास कुस्कर हिच्या मुखावर
विणिते कसली कथा काजळी ?

कुणि पहिलारू लेकुरवाळी
रूपरसीं नवताच लहडली !
पुसत बघत किति कुतुकें रमलीं;

दशा कोणती हिच्या मनाची;
मुखीं दिसेना ऊन साउली ?

# पुन्हा नभाच्या लाल कडा

पुन्हा नभाच्या लाल कडा.

संध्येची जड बसतां फुंकर
रम्य पुंज–घन–खंड धवलतर
पडले काळे निळे नि धूसर
उठे तमाचा माथाशूळंच
तपास ये द्यावया तडा.

उदासीनता माझी घेउनी
झुरे चांदणें सावल्यांतुनी
मीच दिल्या नव तृष्णा फुलवुनि
पापणिनें ढबळून पाडिला
तमः सिंधुचा तळ उपडा.

असफलतेच्या खलुनि वेदना
दिल्या चारुनी कळयाफुलांना
हरितश्री माझीच प्रेरणा
दंयांत आतां नर्विता हांसत
पुन्हा पुन्हा पाहिल मुखडा.

या कलिजांतुनि रुधिर ठिबकलें
स्वर्ण त्यांत अरुणास लाभलें

उपेक्षेंत चैतन्य गवसलें
रे दुर्दैवा, आज नभापरि
ऊर तुझ्या घावा उघडा.

ये भवितव्या, रूप इथुनि ने
तुझें हंसित हें माझें गाणें
अमर माझिया मी मरणानें.
नको आतां ग बसूंस जुळवित
स्वप्नांतिल तुकडा तुकडा.

## एक गरजते ढगाड

वखवखल्या या रानीं
उघाड लक्तेरं धरुनी
उजाडिला मथवाया कां झोकी गगन भाड

पिउनि उन्हाचें पाणी
हिरवे तें वर वरपुनि
बाभळीच्या कवटीचें साधन करि कुणि लुचाड.

गांवाच्या आखरांवर
एकही न ढोर पोर
श्वान घरा भिउन पळे अर्धें चघळून हाड.

चुकटी चंचीमधली
फाकित कुंटिण उठली
कोण बघे भर दिवसां बडबडतो पथिं पिदाड.

तुंदिल तनु वाणिक कुणी
प्राण गुदामीं लावुनि
पावसांतलें उन्हांत तोलुन बघतो घबाड.

## उजेड झाला

उजेड झाला, उजेड झाला.
पिऊनि लाल उत्तेजक कांहीं
दिवस नागडा फिरूं लागला.

'काकडांरती' नच 'भूपाळी'
कुठलें 'उदयाचल' 'वनमाळी'!
पुरनारींचा हयातयाने
नळास मेळा झटूं लागला.

दो खिडक्यांच्या दोनच खोल्या
दमट कुंद भुइ भिंती ओल्या
धुराड धुपते या दिवसाचा
करावयाला सुरूं सोहळा.

वर्षा काळीं जलोत्सवाला
पानमत्त घन समूह जमला;
रानवटांचे सुरूं जाहलें,
गर्जत विविध विलास.

वाऱ्यावरती वसन सोडुनी
अधिर तुझ्यास्तव मेघकामिनी;
वीज न मदभर नयनांतुनि ये
कडकडून अभिलाष.

गढूळ असल्या वातावरणीं
अविचल विन्मुख उन्नत राहुनि;
जागवीत बसलास प्रीति या
एक निळा आभास.

स्वप्नीं जागणें, जागत बघणें;
ज्वलंत शीतल सखिचीं स्वप्नें;
दग्ध विदग्धांचा त्यावरतीं
अखंड होय विलास.

असतां गायन कुठे चालले
(कळे न ह्यांना संगितांतले)
करावया बेरंग सभेचा, हे काढिति
बदसूर.

प्रस्तर झाल्या प्रतिमा सुंदर
कलास्पर्शी कुणि म्हणती ईश्वर
शवाकृतींची पूजा ह्यांची, मूर्ति
करिती हे चूर.

नव्याच घेउनि युगप्रेरणा
रचिति महात्मे नव्याच घटना
विनाश जीवन धर्मच यांचा
जळो ऊद कापूर.

एक आणखी हवे पानिपत
पणास पडलें हें जरि संचित
देवदेखणे नकोत; ह्यांचा वरवरचा
शेंदूर.

# ये मनांत

ये मनांत राया कधीं
मी होउनि यावे नदी!
आवराशिल का पूर प्रीतिचा
दुथडी, बाहू मधीं ?

कधीं सजुनि रसांची रमा
विकसल्येच जर पूर्णिमा
फसशिल ठायीं ठायीं चुंबुनी
सुषमा, नच चंद्रमा.

जर नटल्ये नीलांबरी
तव स्वप्निल भूमीवरी
धांवत थकशिल, क्षितिजें अपुल्या
कवळुनि घ्याया उरीं.

मी भरून आंबेवनीं
येईन लहर होउनी
तुज करीन उन्मद कंपाकुल, पण
नुरेन आलिंगनीं.

वासष्ट

कधिं बावटळीच्या मिषें
उडवीन घनांची पिसें
हासेन खदखदां, तुझिया बघुनी
नयनी शिरतां कुसें.

रे नकोच पाहूं असा
मी तुझीच ना राजसा!
कशि जगेन क्षणभर, तुझ्या
सोडुनी मिठींतला भरवसा!

# चंदनाच्या विठोबाची माय गांवा गेली

चंदनाच्या विठोबाची
माय गांवा गेली;
पंढरी या ओसरीची
आज ओस झाली.

कोनाड्यांत उमडून
पडे घरकूल,
आज सत्य कळों येई
दाटीमुटींतिल.

कांहीं दिसें भरलेलें
रित्या बोळक्यांत;
गवसलें आजवर
जे न रांजणांत.

## धन्य माउली !

साधें कुंकू नाही भाळीं;
कसली शिरिं मोत्यांची जाळी!
वसन हि अंगीं अफाट अपुरें;
काय करिल तरि गगन बिचारें!
मात्र मुखावर भाव असा, जो
उजळी नंदादीप राउळीं.

ग्रहगोलांना कधीं न दिसलें
धुरकट पडकें खुराड कुठलें!
काळ्या काळ्या रात्रीं तिथल्या
डागळीत किति चरितें गेल्या!
संताना हि आज मात्र या
पदराची रक्षील साउली.

कांचोळीविन निर्भर काळा
सुटे एक स्तन तिचा मोकळा;
टकमक बघती कुणी भुकेले
धार दुधाची नच ज्या लाभली.

पासष्ट

# स्वस्त धान्याचें दुकान

सस्ता लावला!
सस्ता लावला!

बन्सि गव्हाचा भुसा घोळुनी
किडे, किडेलीं मिसळ त्यामधीं!
तेजी मंदी पाहुन हेरुन,
कशास दिवसा दिवे मशाली?
आडमाप तें वाणी विकितो!
गांवरान गुळिसाखर सगळी
पडत्या भावामधीं घेउनी
तरल ताजवा चलाख चावट
शेरामागें छटाक खातो.

वहिखात्यावर पहा उधारी
रुपयाची लिहिलीच सवाई.
काळी शाई कलम बोरूची
ढब्बू ओढित ये शिवराई;
मात्र घरीं तसबीर थोरली;
पांडुरंग पंढरिचा तेथें.
धूपदीप नैवेद्य रोज या
गोपीचंदन झिजुन झळकतें.
मौलिक तें तें हातीं फुंकुन

भावभक्तिचा सजे सोहळा
सस्ता लावला! सस्ता लावला!

✤ ✤ ✤

राशींची माखाया टाळू
तेल मागते साडेसाती!
सहा मुलींचा कुणी बापडा,
कारकून व्रत महाग ज्याला,
पीठ शनीला ताम्र मुद्रिका
ओति नरोटी वर तेलाची.
निवली त्यावर कुणास ठाउक
शनीवारच्या आग शनीची!
मात्र पुजारी संध्याकाळीं
आडघरांनीं बघून घ्यावा!
फुकटावर यासम जगण्याचा
पुसून घ्यावा कुठे हि सल्ला.
सस्ता लावला! सस्ता लावला!

✤ ✤ ✤

रंगभूमिचे पुसलें कुंकू
रंग जाहले सर्व पांढरे!
तिचें पांढरें कपाळ फटफट
तोच रुपेरी पडदा झाला!
चौकामधल्या भिंताडावर

उभी रात्रिची रंगित राणी
एक हात कमरेवर, दुसरा
माथ्यावरती बांक देउनी.
अबोल तिचिया पैंजणांतली
दिवसा रुमझुम हलूं लागली
अचल भिंवयिची तऱ्हाच चंचल
डोळ्यांतिल नखरेल इषारा,
शेवरिची नाजूक देहली,
गार जाहला तांगेवाला
'क्या कहेने' ची करित प्रशंसा.
संतोबाच्या पानगृहामधिं
निमास्तिनीचा कळकट पोऱ्या;
बेढब झिपऱ्या जरा सारुनी,
अशी मारितो तान सुरेली
ओठावरची थिजली पट्टी
नकळे क्षणभर ओली झाली.
कुण्या नागव्या सुल्तानाचा
शिवीबहाद्दर व्रात्य छोकरा;
दीड आण्याची लसूण मिरची
उधार आणावया निघाला.
क्षणभर कुठली उघडे खिडकी
काळजांत शर रुतून बसला
'सैंया' 'बालम' झालें गाणें;
त्या गाण्याच्या ताल सुरावर

घरांघरांतुन गळे गुंतले.

चार आण्याच्या

तिकिटावरती,

प्रीतीचा संगीत मसाला

सस्ता लावला! सस्ता लावला!

* * *

तीन वारची लांब निमस्तिन,

तीन वार तंगड्यांना कापड,

अशा गोजिऱ्या पोशाखामधिं

त्यानें आपुली हाडें बांधलीं.

गोलंकारी गोल नेसणें

सहा वार आधुनिका ल्याली;

सहा फुटाच्या भाडघरामधिं

स्वप्न उद्यांचे उमलूं धजलें.

सहा वार जाहली संस्कृति,

शंभरांतला सगळा इमला;

सस्ता लावला! सस्ता लावला!

* * *

एक सांगतो "मुठींत माझ्या

विश्व उद्याचें तयार रचुनी

आणि त्यांत लयलूट सुखाची!

सर्वांच्या हि सर्वस्वाची!"
ट्रूम काढितो नवीच दुसरा
विळे कोयते लावुन परजुन.
सर्वांची सांगता सारखी;
मरणासाठीं स्वर्ग काल्पिला.
मेले, मरतिल कितीक आणिक
खुनाखुनीचा सुलभ मामला!
सस्ता लावला! सस्ता लावला!

## ती तुमच्यावर हंसली रे

ती तुमच्यावर हंसली रे.

खुशाल आता होउनि नंगे
घ्या पापांची सेना संगे
घाला डाके चालूं द्या दंगे
लंका तुमची वसली रे.

तपोधनांना म्हणा लफंगे
पुजा भजा कुणि लुंगे सुंगे
सांगा सतिची उकलुनि बिंगें
चिंता आतां कसली रे !

ढवळ्यावरती फांसा काळे
नीतिमंदिरा लावा टाळे
करा चांगल्याचें वाटोळें
शतके ज्यामधिं खचलीं रे.

पाहुनि तुमच्या रंग यशाचे
अनुकारित लय आवेशांचे
गिरवित विक्रम पदक्रमाचे
कळी कलीची खुलली रे.

बसूंत आम्ही अतां अडंगी
मस्त सुस्त वा मनस्तरंगी
'राव' 'साव' कुणी रंगीभिंगी
सुगी तयांची पिकली रे.

आलें नवें पाणी.

गौरीच्या शिवसुंदर
स्वप्नांतिल हासितांनी
नवतीच्या उच्छृंखल
मादक मदगंधांनी
धरतीच्या भरतीच्या
रंगांनी अंगांनी.
जलदांच्या अनुरागी
खळखळल्या रसरंगा
हरणीच्या कस्तुरिची
कळ कोमल आकळुनी
मुक्तांच्या सुखदायी
शुभ आशीर्वचनांनीं.
भुक्तांच्या उद्रेकीं
हिसळोनी उसळोनी!
कृषिकांच्या श्रमनिर्भर
मोत्यांच्या प्रहरांनी.

वहिनी आल्या.

येतां दारीं रथ रुमझुमुनी
उमले सुमसा स्वर शब्दांतुनि
घुंगरमाळा शुभागमीं जणुं
सामवेद गुणगुणत नादल्या.

माउलिचा घेउनी जिव्हाळा
पिळुनि राग रस किरणांमधला
गुलालरेखा उंबरठ्यावर
मावळतीनें आहा रेखिल्या!

राम प्रहरिंच्या गोड गळ्यांनी
केली ज्यांची नित आळवणी
सासुरवासिनी सिद्धि आज त्या
माहेरा जणुं हंसत परतल्या.

ओसरिवर सिद्धांची वाणी
स्फुरलि फळाया आशीर्वचनी
कष्टांच्या घन स्वर्ण खुणांनी
सुखास्मितांच्या छ्टा लहरल्या.

तारलेली तुळस वाकली
पिंजऱ्याला रसवंती फुटली
गर्भरेशमी इरकल लहरी
        घरभरुनी झिळमिळूं लागल्या.

मुखीं माउली हंसू असूं द्या
कुळ त्यावर उजळतें राहुं द्या
शिणला कळले, वेलदुड्यांच्या
        अतां जांभया गर्द जाहल्या.

# ते आज विसरलो छंद

ते आज विसरलों छंद.

नव्हतें जेव्हां शशिस चांदणें
फुलास कुठलें ठाउक फुलणें
शब्दांतुनि माझिया निघाले
सुरंग, सुरस, सुगंध.

उठला कांपत अचल हिमाचल
दिपलें धडकत तेजोमंडल
सुरखड्गावर सिद्ध प्रेरणा
सफल कराया द्वंद.

रती निघाली अभिसाराला
अनंग आधिच पुरा आंधळा
सभ्य शिकविले प्रसाधनाचे
रूपमदेस प्रबंध.

रमारसांची चोळित डोळे
बघे सभेंतुनी स्वप्न जागलें
पुसति पैंजणा पदन्यास
"हे कवणाचें रसबंध"?

# या जगताची तृषा भयंकर

या जगताची तृषा भयंकर
या जगताची नशा भयंकर
या जगताचें ध्वंसन संचित
या जगताचें प्रलय विलासित.

सजल सुपर्णी लक्ष योजनें
खंडखंड रसगर्भ धरेचे
या जगताला सहज कराया
प्रांत रक्त–सिंचित अस्थींचें.

हवें जगाला धर्मतत्त्वही
गाळ अधर्मातला लुटाया
हवीं जगाला वस्त्रभूषणें
निर्घृण नग्नप्रदर्शनाला.

या जगताला हवी शांतता
युद्धसाधनें परजायाला
या जगताला हवे महात्मे
गोळ्या घालुन मारायाला.

निराळेंच जर विश्व लाभलें
घटनापंडित जमतिल आणिक
सिद्ध योजना करावयाला
विघडित जें जें सुंदर सुरचित.

# एक असा क्षण

दिवस निशांचे कोश उमळवुन
आणिन सजणी एक असा क्षण!

होशिल माझ्या स्वप्नीं जागी
सावरशिल शृंगार लगबगी
विमुक्त अलकांतून पाहशिल
अनुक्त मन हें उकलुन गुंफुन.

टाकिन क्षितिजें चिंतनिं झाकुन
करिन क्षणापरि हें जागेपण
उशास घेशिल सहज संभ्रमीं
दृश्य हेंच दृश्यांतिल स्पंदन.

भिरभिरतिल हे कवनें होउन
तुझिया आकाशांत भावघन
कथा माझिया मनोव्यथांच्या
तुझे सांगतिल, गातिल पैंजण.

उषा अशी मजला दिसली!
सुषुप्तीच मृदुतल्पावरती
रेंगाळत जणुं हिरमुसली.

नयन किलकिले केस मोकळे
लुसलुशीत, उशिवरी विखुरले
स्मरसंगर जिंकिले तयांनी
सुमनदलें चिमलीं, फुललीं.

मद्यार्द्राधर पुसले गालीं
ओसरून मद उरली लाली
गलित शृंगारांतहि लोभस
नवींच ललितें लसलसलीं.

पलकांतिल सुटलेलीं स्वप्नें
उडुनि जाहलीं सुवर्ण किरणें
नव्या निशेत्तव नवींच क्षितिजें
प्रभा नि प्रतिभा वधूं लागली.

कशी उकलूं पापणी?
पापणींत गुंतलेली
कशी सारावी दुलई
बिसतंतुची विणली?

कशी श्वसनांची तोडूं
मिठी नाजूक पडली?
कशी जागेपणीं नेऊं
प्रीति स्वप्नांत जागली?

नाही अजूनि रात्रीला
हिसमुसली जागेंत
शत दहिंवरांतून
दिसताहे अवघडली.

# सय झाली ग

सय झाली ग.

सय झाली गऽ सय झाली
उलगडलें सहर्जीच मनोदल
रूमरुमली स्वप्नांतिल चलबिल
नीरव एकांतास लहडली
सळसळ सुम गंधामधली.
सय झाली गऽ सय झाली.

धूर चालला घरास.

उन्मनमन कवणाचें
नवप्रतिती मधिं नाचें
तरलोत्कट ती दशाच
घे लकार, ये भरास.

फिकट आसमान बघुन
यामिनिचे सेवकजन
फिकट चित्रसुमनांची
शयनीं जणुं रचिति रास.

कुणि रमणी चतुरमति
आलिंगनस्मृति उगविति
गुंफित जणुं श्यामल या
तंतूंचे मृदुलपाश.

रात्र जागली.

धुमिल धूसर दुलई हळुंच सारली.
लुळलुळीत नेसुं करें फिकट नेसली.
भिणभिणती समई श्वसनीं मालवली.
टिकल्यांची कांचोळी उफराटी घाली.
चंद्राची टिकली ही वक्र लावली.
आयना कशास दिला? रात्र आंधळी.
बघति खुळे जन उजळुनि दीप मशाली.

# अजुनि गांव दूर

अजुनि गांव दूर.

शाळु दिसाची पिउनि गारधग
पोटीं झांकुनि मोत्यांची लग
हिरव्या सालरझांकेमधिं हें
रसरसलें चाहूर.

सांध्यरंगिं रंगला, भंगला
पुष्कर–घन क्षण क्षितिजिं थबकला
थकावटींतिल तुझा पहाया
सुका ओलसर नूर.

चाल जरा टेकुनी, खेटुनी,
स्कंधीं कर जाणवता ठेउनि
दुपारच्या भर दहिवरांतला
पुन्हा कांपरा सूर.

छायेहुनि सहचरणशील तूं
वाऱ्याहुनि सहश्वसनशील तूं
तूं सुंदर, तुजहूनहि सुंदर
तुजविषिंचें काहूर.

चित्रफुलांतिल पराग उकलुनि
अपुल्या आलिंगनस्मृति गुंफुनि

निर्मित वलयें नभीं तरंगे
वसती मधला धूर.

अहा ! उजळली दिशा हिकडुनि
माझ्या मनिंचा मोहर घेउनि
उजेडांतला तुझ्याच कीं हा
तांबुरला कापूर.

नको उसासे, नकोत स्वप्नें
नको व्यथांचें शाब्दिक गाणें
पाहत राहिन चंद्र; पहा तूं
चंद्रावरचा खूर;

इतर

कविता

**– बी. रघुनाथ**

# दारांत

पाय पायरीवरी ठेवितां उठली धडधड उरीं
कसा जागवूं तुला कोणत्या तरल कोमल स्वरीं ?
निरभ्र नभिं निभ्रान्त हांसते चंद्रकोर सुंदर
स्तब्ध विश्व, तव मुग्धताच जणुं हें ल्यालें अंबर.
कीं तव फुललीं लावण्याची नभांत स्वप्नें निळीं
तेजस पुष्पांच्या तुजसाठीं किति रिचल्या ओंजळी !
रूपलुब्ध जागेच तुझ्या हे शय्यागृहिंचे दिवे –
उदासीन जीवनांतले वा उजळाया रातवे !
कासारीं विकसलीं तुझ्या किति मोहक रातोत्पलें
उमलुनि माझ्या मनांत सखि, निशिगंध कधींचा डुले.
चुकार सुटल्या मृदुल लटांनीं वदनचंद्र वेढिला
कितीकदां स्वप्नांत हृदयिं या विसावतां पाहिला.
निवेदिलें चिंतनीं मनोगत स्वप्न संगमावरी
शब्द कशाला अतां; आजवर विहरलीस अंतरीं !

पंच्यैंएं शी

# मेघ

केव्हां बांधुनि हिंडतो निजशिरीं फेटा गुलाबी घन,
वेडा धुंडितसे कुणास; न कळे आकाशमार्गातुन.
केव्हां होउनि उन्मनस्क विचरे, ध्यानस्थ केव्हां स्थिती,
संध्येच्या शिखरीं उदासिन उभी ती सावळी आकृती,
स्वप्नीं जीवनदेवता बिलगली घालोनि कंठीं मिठी,
पाहे आतुर वाट बैसुनि कधीं चंद्रावतीच्या तटीं.
ती रुपान्ध मदालसा तुजकडे ढुंकूनही पाहिना
आभाळांतुनि हीं फुलें फुलवुनि देणार कोणा घना?
आतां चालतसे भकास गगनीं प्रेमार्त आक्रंदन
झाला जीवनभार निष्फळ कुठें न्यावा तरी साहुन?
स्वर्गाच्या सुखलालसेंत रमतां देवांगना ती कुणी,
हा विष्कांचन नीलमेघ बघुनी जाणार कां मोहुनी?
जातो दुष्ट विचार विंधुनि मना हा एक रात्रंदिन,
"प्रीतीला दिसते न कां बिलगलें स्वर्गातही मीलन?"

शाहेशी

# निर्झर

रानवेलींच्या स्वीकरूनि माला
निघाला हा निर्झर प्रवासाला
अंतरीचें संदेश सांगतांना
दिसति लवलेल्या तरूंचिया माना.
दुःख साहुनि निष्प्रेम जीवनाचें
तापलेलें पाषाण काननींचे—
शांतवीले निज दयारसीं त्यानें
सजल केली ओसाड रुक्ष रानें.
सरल हृदयांचा स्नेह जुळे जेथें
गोड आठवणी काय उण्या तेथें !
पांखरांनीं भुरभुरत दुरुनि यावें
नितळ झुळझुळ जळिं स्नान या करावें.
रम्य विकसन हें झऱ्या, जीवनाचें
कुणी तुजला शिकविलें करायाचें ?

## पांखरा —

पांखरा, कर शेजारिं निवास.

विरल तमाच्या लाटा उठुनी
केव्हांचा दिन गेला मिटुनी
उदासीन अवकाशामधुनी
सुटति करुण निःश्वास.

गत दुःखांच्या विव्हल स्मृतिपरि
फिकट फुटें चांदणें ढगावरि
लाभला न कोटरीं आजवरि
एकहि स्नेहल श्वास !

भयाण एकान्तिक ही शांती
गर्द गहन साउल्या वेढिती
किती अशा घालविल्या राती
तुझाच धरुनी ध्यास !

स्नेह तुझ्या मधुनयनीं खेळे
गाढ भाव या हृदयीं उसळे
भरांत हिरवा बहर सळसळें
ये लुटूंत मधुमास.

# वेचिशी कुणास्तव फुलें गडे ?

फुलवनीं फुलांचे पडति सडे
वेचिशी कुणास्तव फुलें गडे ?

झंजुमुंजुलें, नभास पडलें
स्वप्न नवतिचें नंदनांतलें;
रंग तेच साकार वाटलें
तुज हेमकान्तिमति बघुनि पुढें.

नयनराग कळिकळीस खुलवी
असुंदरां तव स्पर्श शोभवी
सौंदर्याची सहजताच ही
कांटेहि तुजमुळें सुखद गडे.

मंद पवनिं मधु सुगंध वाहुनि—
शुभागमन तव सुचवित रमणी.
कुसुमित लतिका हलुं थरथरुनी
तुजपुढें हृदय करिती उघडे.

कुठें तुझा पण गुलाब फुलला.
सुगंध तर हृदयीं दरवळला
कांटा करि गुदगुल्या जिवाला,
संकेत फुलांतुनि काय दडे ?

एकुणनव्वद

# गरिबांचा संसार

जीवनाच्या कटु प्रखरशा दुपारीं
ठाण मांडुनि संकटें उभीं दारीं
आणि शेजारुनि बाण दूषणाचे
प्राण विंधुनि जातात निर्धनांचे.

अशा वणव्यांतहि आक्रमिता वाट
पुरवितांहे दुर्दैव सदा पाठ
उधारीला कधिं येतसे पठाण
गमे खाटिक हा कांपणार मान

शिरीं धनिकांची बसे सदा लाथ
दिवस मासहि जातात उपासांत
मृत्यु, तडफड वा कधीं बंदिशाळा—
असा गरिबांचा जन्म सार्थ झाला!

# आई

कालाचे भय काय? वत्सल असे हा हात पाठीवरी
मातेची ममता घडेच भरले कीं अमृताचे घरीं
दुःखाचे अमित प्रहार सहतां भंगोनि जाई मन
धीराचा वच एक मातृमुखिंचा देई नवें जीवन.
अंकीं हें शिर आजही स्थिरवितां ये शैशवाची सय
स्वर्गाचा शुचिभव्यतेसह नवा जीवा घडे प्रत्यय.

# बाभळी आणि आम्रवृक्ष

होती आम्रतरूंसवे उगवली डौलामधीं बाभळी
स्नेही, सत्फल, भारयुक्त भुवनीं व्हाया झटे ही खुळी!
प्रेमाकूल जिवास निर्जल वनीं शेजार लाभे भला
झोपाळून भरून आम्रतरुही वेगांत फोफावला!
छाया शीतल, त्रस्त पांथ सुखवी आले फळां जीवन
राही सद्‌गुणगंध आम्ररुचा चोंहीकडे व्यापुन.
जन्मापासुन कुंपणार्थ झिजुनी निर्मूल हो बाभळी
कीर्ती मात्र जगांत कल्पतरुची आम्रास या लाभली!

होतात येरझारां
        दाराहुनी किती !
स्वप्नें सुखान्त माझीं
        मिटुनीच राहती.
दुरुनी निनादतां तव
        मंजूळ नूपुरें;
हृदयांत मीलनातुर—
        हेलाव डोलती.
कचभार सोडुनी ये
        ज्योत्स्ना—युता निशा
मूर्ती तुझी मनोरम
        ढग काय रेखिती !
स्वप्नांतलें स्मरोनी
        संकेत रोजचे
सरते न ही रिकामी
        जागून जागती !
साक्षीच दग्ध हृदया
        जळता उरें दिवा,
किति वाट पाहण्यांतच
        मधुमास संपती !

# प्रभात चंद्रास —

माळा गुंफुनि निष्प्रकाश गगनीं केलीस आरास ना?
ये शांताच सुशामला प्रणयिनी संगे निशा शोभना.
प्रेमालाप करूनि मुक्त हृदयें या अंतराळांतुनी
आतां पेटवुनी धुनी उडविशी रक्षा कशाची जनीं?
भूताचें तुझिया प्रकाश मिरवी शृंगारलेलें शव.
चंद्रा, निष्ठुर काल जीवनिं तुझ्याही घालितो तांडव?

# सजणा

सजणा, तूं राजा मी राणी!
स्वप्न सुरंजित अपुलें जीवन
मधुराशांसह ये ओथंबुन
तेज फुलांना चढें नभांतुन
अपुल्या मीलन—ध्यानीं.

हरित प्रान्त वनसरणीमधले
शीतळ वरि चांदणें बहरलें
झऱ्या जवळ मंदीरहि अपुलें
आपण धुंद विकसनीं.

चिन्मयतेच्या तुझ्या पथावरि
मी जळेन नित दीपशिखेपरी.
शिणतां संजीवन अभ्यंतरिं—
आणुंत रसनीं श्वसनीं.

पंचाणणव

## जीवन मेघ

ऐन जीवनांतल्या दुपारीं जीव तळमळे तरी
कुठें सांग हिंडशी पेटल्या अफाट या अंबरीं ?
येरझार रोजची तुझी या टळे न दाराहुनी
रिताच कां परतशीं मंदिरीं क्षणभर डोकावुनी !
दोन प्रहरची रात्र पाहुनी अवचित येशी वरी
नको असा कोरडा जिव्हाळा, प्रीत हवी मज खरी !
चमकुनि चपला धुंद होउं दे नील तुझें लोचन
तरु शाखांतुनि मत्तमनोहर मग उठेल स्पंदन
उच्छृंखल माझ्याहि मिसळतिल त्यांत मनोभावना
तृषार्त निर्जल जीवन जाइल फेसाळुनि मग घना.

शहाण्णव

# लागेल डोळा कसा ?

प्रेमळा, लागेल डोळा कसा ?

पांखरचिवचिवणी ओसरली
सांजेसह सुखस्वप्नें विरलीं
पंखांची भिरभिर न श्रवली
रिता राहिला कुसा.

नीळ तुझ्या इवल्या डोळ्यांची
निववी दगदग कटु दिवसाची
फसवणूक पण होय जिवाची
ढगांत बघतां ठसा.

ये पांघर हा गोड उबारा
चोंच देइ चोंचींत पांखरा,
नितळ तळीं जळ, झुळ झुळ वारा
आनंद कुठें असा ?

# संगमानंतर

दुरुनीच बोलणें, दुरुनीच राहणें
ही दूरता जिवा सहवे न साहणें.

तेव्हां परस्परां किति घातल्या मिठ्या
त्या जाळत्या स्मृती हृदयांत वाहणें.

नवख्याच प्रीतिच्या कलिका सुकोमला
पदिं आज आपल्या तुडवोनि चालणें.

कांय तुझ्या उरीं, कळ माझिया मनीं
आतां कुणी कुणा बोलून दावणें?

येतील रोज राती, वरसेल चांदणें
पण त्यांत भिन्न आपण झुरुनी विहारणें.

# गुलाब

फुलें उद्यानीं फूल गुलाबाचें
रूपलुब्धांचें प्रेय रसज्ञांचें.
कुणी मोहुनि कर सहज पुढे नेतां
फूल कसलें? रुतलाच करीं कांटा.
ज्योत मोहक वैरीण पतंगाची
बुल्बुलाला कळि झुरवि गुलाबाची
छद्म सारे रस रंग रूपसांचें
विषासंगें खेळणें भुलुनि साचें.
गुलाबाचा लांबून वास घ्यावा,
जवळ कांटे साधिती सदा दावा.

## रे मानव, —

रे मानव, असशी दानव का?
विहंग–ज्यांच्या कूजनिं रमशीं
रंजनार्थ पंजरीं आणिशी
क्षुधार्थ कधिं काढुनी, तयाशीं
तूं खुशाल खाशी फाडुनि का?

विश्वोद्धारक वत्सल जननी
वत्स जिला प्रिय निज जीवाहुनि
नीतिभयें कधिं पाउल चुकुनी
शिशुकठिं करुद्ध कर रोवित का?

रूपवती काल‌च्या कोवळया
आज रूपरसहीन वाहुल्या
करीं तुझ्या निष्प्राण जाहल्या
भोगांत राहशी सदा भुका.

शंमर

# जर असेल तुझिया मनामधीं –

का. क्र. ८५११

जर असेल तुझिया मनामधीं–
        सोडुनि ये संकोच इथें पळ
        ऐक जरा जवळोनी खळखळ
मज पहा माझिया स्वनामधीं.

        तुझी तुला साउली पुरेना
        एकाकीपण मजहि सहेना
मिळुनीच पोळुं तरि उन्हामधीं.

        प्रेरक नवथर तुझ्या भावना
        करतिल माझ्या मधुर वेदना
कधिं गाउं वनीं कधीं घनामधीं.

        ये निरंत घे हृदयीं पेट
        हवे मला ज्वलनही विराट
त्या तुझ्या अमर भरपणामधीं.

# देव आणि दरिद्री

गरीबाचें घरकुलें निवाऱ्याचें–
अमर दुःखांच्या विश्व विहाराचें !
संकटांचे जे साहती प्रहार
तयां कैसा भगवंत तारणार!
जिथे पैशाच्या उंच दिसति राशी
उभा राहे हा देव तयापाशीं!

## वैराण

जिवा भावाच्या गोड कथा कांही—
कथायातें ज्या जीव अधिर होई
हवे त्याला हुंकार जिव्हाळ्याचे
जिव्हाळ्याच्या स्नेहाळ पांखराचे !

कुण्या स्कंधावरि ठेउनिया मान
व्हावयाचें संकटीं समाधान ?
राजवाडे ओसाड उभविलेले
आणि उरलें वैराण पेटलेलें !

# साथ नसलेलें गीत

किति वाट राहिली तरी पुढें?...

पेट्टनि वन ये कढत फवारा
जरा दिसेना कुठें निवारा
पसरूनहि पाहिला पिसारा
पण दिसें ढगाविण नभ उघडे.

आसुहंसूंचा सरला पाझर
एक उरे हुरहूर निरंतर
तृषार्थ मृगजळही न दूरवर
न्यावेत कोठवर रिते घडे ?

फुटल्या वाटा, सुटले साथी
भकास माळावरल्या रातीं
नाजुक तुटल्या तांतीवरती
कां भग्न मनाचे गीत चढे?

## नदिवरी —

नदिवरी येशि मनहरणी ग,
कां ठरे न पाउल सदनीं ग?

खोल, कठिण वा खारट म्हणुनी
आसपासचे कुवे सोडुनी
शकुंतले, सखिनयन चुकवुनी
नदिवरुनि नेशि घट भरुनी ग.

पाहतांच तुज घाटावरती
रेखिति लाटा लचक नवतिची
क्षितिजावरि रसकुंभ हिसळती
अनुरागपथीं भरभरुनी ग.

डबडबतें शिरिं घटांतलें जळ
यौवनरंजित निथळे अंचळ
कटाक्ष मदपूरित नयनांतिल
कळ लावि प्रथम कळ करुनी ग.

वाट नदीची आधिंच निर्जन
ऐन सांज अवसेची त्यांतुन
होइल बाहिरबाधा, पाहुन
कुणि करिल गोरटिस करणी ग.

# गांवगंगा

चमकला मोरणींतला खडा !
किति सुरळित संसारासि लाविला तडा !

रंगला ओंठावरतीं विडा
कोवळ्या बहारींचा करुनि जणुं चुरडा.

भिरभिरा नजर शिकारी फिरे
परजले विखारी मोहक घेउनि सुरे.

चंचले, सावर ग अंचळ
किति चाळविले, कितिकांस चारिशी धुळ!

मळविले शीलवंत कुळनिधी
जाळुनी गांव तूं अजुनि गंगा सुधी !

# गुलाब आणि कांटा

" कांहीं आठव काळ बाळपणिंचा माझ्या जिवाच्या सख्या.
हो या जाळित तप्त तेजलहरी तीव्रातपीं सारख्या.
गेला पायिं किती चुरोनि कलिका संहार डोकावुनी !
होता कंटक नित्य सिद्ध तुझिया सन्नीध संरक्षणीं.

" रुपोन्मादभरें तुझें उमललें पुष्पा, जधीं यौवन;
झाला जीव कृतार्थ पाहुनि तुझे हें रम्य उन्मीलन.
तूं मी धुंद सुगंध–स्वप्निं, वनिं या एकाच देठावरी
प्रेमोत्कंठ परस्परा बिलगुनी; आधार द्यावा उरीं !...

" हा ! हा ! मत्तसुमाधमा, रमणिच्या तूं आज केशावरी
स्थानभ्रष्ट मला कसें करवलें निस्नेह भूमावरी ?
तेव्हांचीं चिरमैत्रिचीं सुवचनें का जाहलीं विस्मृत ?
आतां दंश स्वभाव राहिल कसा झाल्याविणा जागृत !

" नारींच्या क्षणभूषणीं न कुटिला, साफल्या मानी तरी
पुष्पा, जाशिल कुस्करोनि कुठल्या शृंगार शय्येवरी !" ...

## सौंदर्य !—

सौंदर्या, नवख्या जिवा न कळली चाहूल तेव्हां तुझी,
होती अंगणिं पाउलें उमटलीं आणीत पुष्पें रजीं,
गेलों धांवत भ्रान्तचित्त फसव्या मी जों प्रकाशाकडे;
माझा भार मलाच होउनि उरे अंधार चोंहीकडे.

तेव्हां घालुनि हांक मंजुळ दिली त्वां थाप दारावरी,
धाले लोचन पाहतांच, मधुऱ्याही आगिल्या घागरी.
शेजारीं वसती निरंतर तुझी होणार ना राजसा?
आतां काय रिता रसां, पसरितां हा राहयाचा पसा?

# — !

प्रदोषकालीं नभांत दिसते ही क्षणभर लाली
काय भविष्यें उज्वल अपुली त्यांत रेखिलेली !
असतिल वनिं कां कुठें बांधले सुंदर हिंदोळे ?
दिसूंत आपण त्यांत मिळुनि कां कधीं विहरलेले ?
आशेचीं मंदिरें उभविलीं वाळवटावरती—
काल प्रवाहीं विरतिलही; का जड उरेल माती ?
नको कुशंका भरुनि राहिला हृदयिं प्रणयभाव
कळ्यांतुनी कुणि अपुलें संयोगित लिहितिल नांव !

## परंपरेचे बळी

देवतांचे नउ नवस सफल झाले
सोनियाचे गुणि बाळ गृहीं आलें
हलूं लागे मग पाळणा घरांत
काय वर्णावी माउलिची प्रीत !

पिताश्रीनीं नवनवे, बेत केले
धन्य जीवन वाटलें सार्थ झालें !
आणि आकस्मिक मृत्यु प्रगट झाला
वाळलेल्या पानास हरुनि गेला !

बाळ आले कर्तृत्व—प्रांगणांत
देह झिजला मिळवितां जीवनार्थ
अशा कष्टांतहि वंश वाढवीला
भक्ष्य शोधित सन्नीध काळ ठेला !

# पडली बग झाकड

पडली बग झाकड, लागली जिवास घरची वड.

या समूद्या शिवारांतुनी,
चिट्पांखरू नाहीं कुनी
झालं ज्वारहि बग मुक्यावानी
घरकुलांत मैना एकटीच कर निघायची तातड.

रानच्या उन्हातान्हानं
लइ आलाय् शिन रावुन
सय वाडुळची होउन
गुचकी लागुन असल सईची नजर माथ्याकडं.

जर उशिर व्हइल खिन्भर
ती निवल ना भाकर,
तें तोंड व्हइल् गोरं मोरं,
कळ इकडं माझ्या उरांत वाटल् जर तिकडं अवघड.

साधल औंदा जर सुगी,
सावकाराची निवल् धुगधुगी,
सकू मग सजल बावन नगी,
ती धुऱ्याजवळ गुळभेंडि रानिला कवळी कवळी खुड.

काळास —

काला, टाकिशि कुस्करोनि अवघ्या
आशा मनींच्या मनीं;
काल्यांतूनि कुठेंहि निर्दयपणें
नेतोसि ने ओढुनी.

माझ्या रम्य सुखस्मृती उरिं तुझ्या
मी चाल्तों घेउनी;
कां काळें करितोसि खोल दडुनी
काला, भविष्यांतुनी ?

# मिटव नेत्र तेव्हांच —

मिटव नेत्र तेव्हांच दयाळा, लावूं नकोस उशीर.

यौवन संभ्रमिं, प्रणयाराधनिं
अधरिं स्वयें मधुच्चषक निरखुनी
चंचल, वंचक रूपलता कुणि
रुतविल जो उरिं तीर —

निस्सिम प्रेमळ सखेच हे जर
घालुनि कंठीं क्षण स्नेहल कर
भडकतांच मत्सरांत स्वांतर
काढतील खंजीर !

उभा विरह, मीलनास बिलगुनी
नकोच विरही—मीलन म्हणुनी.
दिसोत सखिचे पैल तिराहुनि
आतुर नयन मदीर.

# एक गीत

घट रिते राहती घरोघरीं!

मत्त नृपांचे प्रहार साहुनि
रुधिराचे भीषण नद वाहुनि
किती भविष्यें तटस्थ पाहुनि
हें जीवन, काय उरें पदरीं?

सुधा–कुंभ नंदनींच सरले
स्वप्न मात्र तव नयनिं तरळलें
कालचरण सदनांत उमटले –
धन तुझें हराया परोपरी.

उन्हेंचि साहुनि वनीं निरंतर
तिमिरहि आतां गमे प्रखरतर
गगनधरेचें रितेंच अंतर
कां निववि युगांची तृषा तरी?

# टिचकी

या पडक्या वाड्यांत गांठुनी मजशि एकटिच कीं
सांज न टळली तोंच सख्या, तुझि दारावरि टिचकी!

तुज न लाज पण मी परनारी
अवति भवति टपले शेजारी
पाहुनि तुजला भलत्या दारीं
लोकांत गलबला करतिल कीं !

चुळबुळ मज माझीच बुजविते
सभय गृहीं क्षण दीप उजळिते
फिकट ज्योत चरकते, थरकते
तुझि खोल काळजामधिं धसकी!

सहज देहरंजनास बसले
जड गळुनी शृंगार चालले
वसन अंगिंचिं रुतूं लागलें
पाहशीं फटीतुन टकमक कीं!

मूढपणीं कधिं चुकला डोळा
सूड आज त्वां पुरा उगविला
चुरगळशिल, बहु जपले ज्याला
कशि देउं अतां तुजला हुलकी !

# मनधरणी

कुरवाळुनि करिशी मनधरणी
चेटक्या तुझी कळली करणी.

प्रणयवचन कानीं कुजबुजशीं
अनुरागें बिलगशी, विलगशी
प्रेमभरे लाविशी कधिं कुशीं
स्वप्नांत टाकशिल मज चुरुनी.

सांगशि सुंदर वसनें ल्याया
प्रसाधनें नवनवीं कराया
लक्ष्य तुझें पण आंतिल काया
सौंदर्यप्रियता मनिं उसनी.

प्रभा तुला पण जळतें अंतर
उजळितोसि निज विलासमंदिर,
कुटिला भडकवुनी जीवनभर
देशील घनतमीं भिरकवुनी.

# पुसाल आतां मला कशाला ?

घरासि तेव्हां चुके न फेरी  चिरे दारचे झिजूनि गेले
उसंत आतां न यावयाला  निरोप जरि रोजचेहि केले !

प्रसन्न मजला करावयाला  मधुर वाणिचे झरे न खळले
सुकें स्नेहहीन जीव माझा  आतां बोलणें महाग झाले !

दुरोनि दिसलें हरीण भोळे  शिकारीच पण शरार्त लोळे
पुरापरी आलांत अकस्मित  मला प्रवाहीं हरूनि नेलें !

पथीं कधीं सन्मुख दिसतांना  अतां चोरटा फिरे न डोळा
असेल दुसऱ्या घरीं सोहळा  पुसाल आतां मला कशाला !

# फुंकर

अशि गोड घाल सइ फुंकर ग;
जी धुंद करिल हें अंतर ग.

काट्यांची कळ पुरति न निवली
शेज फुलांची रुतूं लागली
विकल शिथिलता तनुंतुनि भरली
निज श्वसन चुंबनीं मंतर ग.

स्वर्ण समजलों—झालें मृत्कण
पुटें चढति किति आंत बाहिरुन !
कुठवर टाकूं मळवुनि जीवन !
ये उडव धुराळ्याचे थर ग.

भयाण पडक्या बुरजावरती
काळपांखरू घुमे निवान्तीं
विद्ध चरकते यौवन स्वान्तीं
प्रणयोष्ण पसर वरि पाखर ग.

## पेटवुनि घे पणती !

ये इथें आपुली पेटवुनी घे पणती !
क्षण एक प्रभाकण फुलुदे मलिन स्वान्तीं !
केलेस खुराडांतुनी आजवर गाणें
जळलास गर्द रातींत निरानंदानें.

घर तुझें तुला जाहली भयानक कारा
ये बाहिर बघ उगवला ध्रुवाचा तारा.
घातल्या मृत्युला हांसत ज्यांनीं माळा
धगधगे तयांची प्रेरक येथें ज्वाळा.

हुंकार उसासे जे भोंवति थरथरले
ते धन्य, त्यांत जे रमले, झुरले, स्फुरले !
लागली गळां जरि तांत इमान न चळलें
त्यांचेच इथें किति दीपराग झळझळले !

या अमर दीप्तिच्या दिव्य यज्ञयागांत
नवलाख स्वयंप्रभ रिचल्या ज्योती गात.
ये इथेंच अपुली पेटव निष्प्रभ पणती
मग नवा जीवनानंद नवज्वलनान्तीं.

# कुठे कसें ग, पडलें कुंडल ?

कुठे कसें ग, पडलें कुंडल ?

पाणवठ्याहुनि लगबग येतां
नसतो माथीं पदरहि पुरता
काय तिथे ग, उठतां बसतां ?
धुंदिल नयनीं कसली धांदल ?

वाढवेळ शिवमंदिरिं असणें
अशीं कशीं हीं देवदर्शनें ?
कुण्या तेथल्या गोसाव्यानें
धुनी फुंकली भरित कमंडल ?

उपवनांतल्या सुमसंभारीं
नजरांच्या गिरगिरती घारी
न कळे तिथल्या गहनांधारीं
नेलें कुणि नयनांतिल काज्जळ ?

थरथरत्या लवत्या पापणिने
दान कुणा केलें का ग, हिने ?
मिटल्या नयनीं डहुळे नगिने
निळें पारवें तारामंडल.

कोणत्या स्वर्गाचीं फुलें हीं सुंदर
मृदुल मधुर हांसतात.
हिरवी हिरवी कान्ति मंद मंद तेज
माणिकाचे साज अंगावरी.

वायूच्या आंदोलीं स्वैर घेती डोल
शैशवाचे खेळ खेळतात.
किती गोड गीत किती गोड स्वर
घुमे वाऱ्यावर कोणाचा हा?

मधु स्निग्ध हास्य उमटलें गालीं
वृत्ति गोड भली आनंदाची.
मृदुल छटा ही हंसऱ्या मुखाची
मूर्त मार्दवाची खरोखरी.

साधासुधा भाव हृदय साधेंच
नाही त्याला पेच कपटाचा.
फूल—पांखरांनी बागडत यावें
चुंबत गुंगावें नित्य तेथें.

मंद, शीत, शांत वायूच्या झुळकींत
चित्त सम्मीलित होय त्याचें
पौर्णिमेची रात सुधामय सारी
स्वर्गभूमीवर आणीतसे.

शशीराजयाचे शुभ्र रश्मीकर
　　गुंफिती झालर कुरणाला.
इंद्रधनुष्याची वरी प्रभावळ
　　शोभतें झुंबर तारकांचें.
गुंफुनिया हार गाती गोड गीत
　　स्वर्गाला अर्पीत देवमीषें.
नित्य शोभा ऐशी पहाती सर्व ही
　　मजा और कांहीं परी त्याला !
वसुधेच्या अंकीं सुखें पहुडावें
　　दिव्य हें बघावें सदोदीत.
हांसत खेळत हूड हा निर्झर
　　धरी गोड सूर त्याच्या संगे.
वात्सल्याच्या मूर्ति सर्व वनमाला
　　जोजवीती त्याला आनंदानें.
किती गोड जीव किती आयु गोड
　　पुरवीत कोड सृष्टीदेवी !
जीवित हें गोड जगीं लाभे कोणा ?
　　सुखी तेचि जाणा जगीं एक !
हांस हांस गड्या कुरणा स्वच्छंद
　　कालाचे हे बंध तोड झणी.
असेच हास्याचे घाला नित्य सडे
　　जगा द्यावे धडे सत्प्रेमाचे.
जग हें असार बाजार स्वार्थाचा
　　करी लोप त्याचा निज हांसें.

फुलाचे ज्या श्वास कोमेजवितील
तेज त्या बाधेल अरुणाचें.

उषे, जरा थांब मुख घे झाकून
करपेल कुरण दृष्टिक्षेपें

असा नैर्मल्याचा कुरणा, व्यासंग
टिकावा अभंग चिरकाल.

खेळ फुलां फुलवून
समीरा, खेळ फुलां फुलवून
फुलवंती ही फुलुनि बिचारी
हाय जाय करपून !
जिवलग लतिका साज सुमांचा
दे मातिंत मिसळून.
या कलिकेचे अश्रू आले
गालांवर वघळून.
तरल विरल या मृदु हृदयाची
आशा जाय जळून.
ढळढळ रडती वनमाला या
घे अश्रू झेलून.
साद घालतो झरा बापुडा
ये ती तरि परिसून.

# माझी चिमणी

नील नभावरती नाचतीं किरणें सोनेरी
सृष्टीच्या वदनीं पातली टवटवीच न्यारी.
खाली वरती हें उधळलें जें पिवळें पाणी
चराचरासंगें गातसें मंजुळमय गाणीं.

छे—रंगीत झोला बनविला तुजसाठी बाई,
बसूनिया त्यांत तूंहि तव गान गोड गाई.
कळ्या फुलांनीं हे उघडिले नाजुक नव डोळे
साद सुगंधाची घालुनी बघती भंवताले.

या झुळकीवरती चाललें गीत गोड त्यांचें
त्या मंजुळ नादीं मोहिले कळपहि मधुपांचे.
बघ आनंदाश्रू पातले सर्वांच्या नयनीं
त्याच आसवीं हा राहतो निसर्ग दरवळुनी.

कोमल वनमाला वाकल्या पदर सावरोनी
दऱ्या नादवील्या गाउनी गीत निर्झरांनी.
जिकडे तिकडे हें लाडके, नादब्रह्म नांदे
परि मजला छकुले, मंजुल स्वन तव परिसों दे.

ये ये बाहेर झडकरी घरट्यांतुनि बाई,
मंजुळ तव लहरी उधळुनी अवकाशीं देई.
भव्याकाशांत चालले खेळत चंडोल
राघू मैनांनी उघडला अपुला मधु बोल.

एकशें पंचवीस

काव काव करुनी उडाले कावळेहि भंवती
पिकहि गात सुटले मिसळला स्वर वाऱ्यावरती.
गायनमय नभ हें सृष्टिही गायनमय झाली
परि अजुनी गीतें तुझीं तर कानीं नच आलीं.

नको नको मज तें नको गे, गीत कोकिलांचें
परि मज ऐकूं दे तुझ्या त्या चिमण्या कंठाचें.
बाहिर आलिस ना अतां जा उडून गगनांत
परी थांब तूझी भरूं दे मूर्ती डोळयांत.

पाचूचे डोळे पाहुं दे मजला फिरफिरुनी
सुमनाहुनि भारी तशी ही तनु गोजिरवाणी.
कोमल गौरांगी शोभते चंद्रकला ढवळी
चिमणी गोंडस ही भुलविते तव चंचू कवळी.

थांब थांब चिमणे, बांधुं दे तुजला हृदयाशीं
चुंबनमय गाणीं गाउं या एकामेकांशीं.
त्या लहरीवरती खेळूं तूं मी चिरकाल
असार जगताचें तोडुं ये संमोहन जाल.

'चिवचिव' शब्दांचें पाहुं दे स्वर्गीय संगीत
त्यायोगें बाई, सुखाचा उधळ वरी झोत.
त्या सुखांत तूं मी गाउं ये गाणीं प्रेमाचीं
कशास मग आस ठेवणें इहपरलोकाची !

तुझिया संगीतीं चित्त हें संमोहित होतें
आनंदानंदीं हृदय हें वाहुनिया जातें.

तुझ्या गानलहरी खेळतां मन्मानससरसीं
काव्य नवें उपजे सर्व हें विदित न का तुजशीं ?

ये ये ये जवळी लाजुनी काय दूर जाशी
विसरलीस अपुली सखे, का ओळख तूं पहिली ?
काय चाललीस एकटी विहराया वरती ?
घे मजला संगें ताप हा साहूं कुठवरती !

अपूर्णतेने या जिवाचा हो चक्काचूर
ये नैराश्याचा सदोदित हृदयाला पूर.
आशामय सुमनें उपजतां जातीं करपोन
तपपूरित जगतीं फिरुनिया फुलविल त्यां कोण ?

आशानैराश्यीं चित्त हें खाय नित्य झोल
दुःख दूर करुनी तूंच हें हृदय गंडे तोल.
छे ! ऐकुनि बोल तुजविणे सांगू कोणाला ?
जातिस तर जा गे, गीत हें गातों मी तुजला.

परि इकडे वळुनी एकदां बघ चिमणाबाइ,
येशिल कधिं फिरुनी हेंच मज सांगुनिया जाई.
तूं येईतों मी असा हा बसेन गे, गात
जा जा जा आतां परी तूं ये झडकरि परत.

जा हळूंच जपुनी रवीचा कर तुज बाधेल
तुजसाठी बघ ही गुंफितों अश्रूंची माळ.
रंग प्राचीचा उमटला पश्चिम दिग्वदनीं
शांत जाहली ही क्षणामधिं आतपार्त अवनीं.

सांध्यसमुद्रीं हा उतरला विरहें रविराय
परि कोठे अजुनी दिसेना मज चिमणीमाय.
ये झरझर सदना परत हा विहगवृंद सारा
ध्वनितुषार उधळी भोंवती मंद शांत वारा.
परि माझी चिमणी दिसेना मज कोठे अजुनी
कां शिणून पडली एकटी भयाणशा रानीं.
छे ! सारें खोटें पहा ही आलीसे परत.
बाळांना आणिलें कांहि तरि धरुनी चंचूंत
छे ! कसलें कांही दिव्य परि चराचरांतील
एक तयामधला घास का मला घालशील ?
छे ! घांसहि कसला चषक गे परी अमृताचा !
तुच्छ तया पुढती भासतो वासहि स्वर्गाचा.
तुज सम जर पंख मला हे देवाने दिधले
तुझिया सहवासीं आयु हें घालवीन सगळे.
चीं चीं शिशु करितीं आतां जा जा घरट्यांस
मत्कवनांचा हा तूजशीं घे आशीर्वाद
परी रोज रोज येउनी रंजव हृदयास
तव सहवासाची लागली खरोखरी आस.

# सूर्याच्या किरणासवें

सूर्याच्या किरणांसवें विखुरल्या नाना मनीं कल्पना.
वाऱ्याच्या लहरींसवें भरतसे देहीं नवी चेतना;
यष्टीचीवरि हांसतीं खदखदां ताजीं फुलें कोवळीं.
माझ्याही हृदयांतली विकसली एकेक ही पाकळी.

हांसे ही वर मंजुमंजु वदनीं पूर्व–प्रभा–सुंदरी;
झाडें डोंगर न्हागिले सकलही हास्यामृताभीतरीं
अंधारांत कुठे पडोनि अगदी होतोच मी बापुडा;
आलों बाहिर पाहण्यास उठुनी हास्यामृताचा सडा.

रात्रीं भेसुर जीं असें बघत तीं स्वप्नेंहि झोपेंत मी;
सारीं या किरणावलीस बघतां अदृश्य झालीं तमीं.
तेजानें उजळून दिव्य दिसती रानांतलेंही खडे;
माझेंहि हृदय क्षणांत अगदी हें शुद्ध झाले गडे.

होते कृष्ण घनावलींत सगळे शुभ्राभ्र हे कोंदले;
माझ्याही हृदयस्थलावरि तसे दुःखाश्रू ते सांचले.
आकाशीं परि पातली धवलता तेजाचिया सिंचनीं;
तें राहील कसें मग क्षणभरी मालिन्य माझ्या मनीं!

जें हृत्प्रांत प्रमुग्ध स्निग्ध करितें, नेत्रास आल्हादितें;
हर्षाचें प्रतिबिंब जें मग स्वयें अश्रूंत ओथंबतें;
तें आलें किरणांसवेंचि दिसुनी सौंदर्य सृष्टींतलें.
या काव्यांतहि वाटतें मजप्रती सौंदर्य का सांठलें!

हे कांटे करिं बोंचतात म्हणुनी ते त्याज्य कैसे तरी?
लाधे जन्म सुमावलीस इथुनी हे कोण जाणे परी?

नील नभावर विखरुं लागली चंद्रसुधा हांसरी;
तीच हो प्रतिबिंबित या सरीं,
हृदय द्वयांचें एक जाहलें; होय तनू कांपरी
पहा या तरल तरंगावरी.
प्रीत्युच्छ्वासीं प्रफुल्ल पद्में हृदयावरि हांसलीं;
फांकली प्रभाच प्रेमांतली
मधुनुपुरनाद भोंवतीं लतांचा घुमे!
गातात येथलीं स्वर्गिय संगित सुमें!
क्षण बाहिर येउनि रमव विधुस दर्शनें!
मृदुल पांढऱ्या पंखांवरचे तुषार उडवी वरी;
झेलतिल तारा वरचेवरी.

# कोण कोणाचा—!

दाट भरला बाजार या जगाचा
देव घेवीचा माल विमोलाचा
लाभ ज्याचा तो त्यास बोलणार
कोण परक्याचा मान राखणार?

फुलें वेलीवर रोज उमलतात
गंध पवनीं आपुला पसरतात
हाय त्यांचा परि लाभ काय होतो?
गंध ज्याचा तो पिउनि दूर जातो.

नद्या ओढे निधिकडे धांवणार
रुक्ष माळाला कोण पाहणार?
दिसें सारेंही जग स्वतांसाठी
कोण दुसऱ्याची धरावया काठी?

✤ ✤ ✤

रीत जगताची जाळिते जिवाला
'कोण कोणाचा?' ध्यास हा मनाला.

# मृत्यु-प्रिय !

पुष्पाचे पडतात नित्य अपुल्या बागेंत देवी, सडे
वेचाया मजलागिं आज लवही गोडी गमेना गडे.
जीवाच्या करुणासवीं हृदयभू आधींच ओलावली
हातींचीं सुमनें तशींच गळुनी धूळीमधे चाललीं.

दुःखाच्या प्रखरप्रभेंत न कुठे जीवा दिसे साउली
गालाच्या खळगींत अश्रुपटलें हीं वाळुनी चाललीं.
कांट्यातूनहिं मार्ग काढित चलें; ठेचा किती लागती!
लोकांचा व्यवहार व्यर्थ हृदयीं पाडी सदाही क्षती.

अतां हें जगतांतलें सकळही कंटाळवाणें जिणें
जीवाचा पुढचा प्रवास दिसतो भेसूर यां साजणे,
जन्माचें मरणांत जीवन फुलें तेथेंच ते ही सरे
मृत्यूला कवटाळणें मज परी आतांच वाटे बरें.

# मोरणींतला खडा !

प्रवासी खडा मोरणीचा
थांबला कां डोळ्याखालीं ?
कशाला उघडलास डोळा ?
पाहसी काय भोंवतालीं ?
सांवळ्या प्रेमल डोळ्यांची
साउली गार निवासाची;
अशा नयनांत जाणवतें
काय दगदग प्रवासाची !
गुलाबी थाट जिव्हाळ्याचा
पुढें तर दाट पसरलेला
प्रवासी खडा मोरणीचा
तिथें जिवभाव विसरलेला ?
सोडुनी सुमन वेणिवरलें
पसर ही चुकार केसांची.
हळुच अति हळुच वळुनि बघते
तिरिप जणुं डाव्या डोळ्याची.
खालती अधरबंध लाल
पुढे तर उभा फुगिर गाल.
अशाने मार्ग प्रवासाचे
खड्याचे या अडखळतील

पांघरून बसलास लाडक्या, जरतारी शाल;
चढविलास मोहाचा वरती रस–रंगहि लाल.
पहा जरा लोचनें उघडुनी, काय सभोंतालीं;
तृषित जिवांची, करुणरसाची एक हांक उठली.

पदाघात घातक्या; पुरे हा, चालक तळमळले;
नादमधुर हृत्प्रवाह तुज पुढती किति अडखळले!
अर्धोन्मीलित कोमल कलिका लोळतात चरणीं;
थरथरतें बघ एक एक तें दल दल उलगडुनी.

* * *

स्फोट करुनि हृदयाचा, घेशी घोट आंसवांचा;
घसा असा हा तुझा किति युगें रिक्त रहायाचा!

झुंजुमुंजलें, हिरवळ हांसे रानीं चौंहीकडें.

नील नभावर कोमल किरणीं
दिशा गुंफिती मंजुळ गाणीं
तारकमाला निळ्या जांभळ्या पदराखालीं दडे.

अरुण–उषेचें मीलन झालें
रम्य रंगहीं भंवती भरले
गालावरची अश्रुमाळ अन् पानफुलावर पडे

हिरवें पिवळें कुरण कोवळें
पडले त्यावर मोति–पोवळें
काव्य सृष्टिचें गात अंबरीं विहंगमाला उडे.

बांधुनि हृदयीं लतालतांना
वरिवरि घेउनि मंजुळ ताना
वनराईच्या पानफुलावर वात नाचतो गडे.

कळ्या फुलांना भ्रमर भेटला
प्रेमाश्रूचा पूर लोटला
हृदयीं घुमतें जिवाशिवाचें गीत; अमंगल दडें.

ओसाडींतिलही लतेवर सदा येतात पुष्पें नवीं;
आशेची हृदयीं अशीच फुटते रात्रंदिनीं पालवी.
ग्रीष्माच्या प्रखरातपांत सगळीं जातीं झडोनी फुलें;
येतां दिव्य वसंत, हांसत पुन्हां सौंदर्य सोरं फुलें.
जों जों चित्त निराश होउन सरी दुःखाश्रुच्या वर्षती;
आशापाश वरीवरी दृढ जगीं होती जिवाभोंवतीं.

# प्रीतीची समाधी

हृदयाच्या अंगणांत भावनांची ग हिरवळ
वाहे झरा झुळझूळ पावित्र्याचा.
स्मृतीच्या ग वेलीखालीं असे समाध प्रीतिची
वरी झूल ही जीवाची— झांकीयली.
सुखाची न सरे संध्या प्रमादाचें सुकें फूल
आयुष्याचा गोड काल हारवला.
काळया निळया ढगांवरी फुलें सांडलीं जाइचीं
माळ तुला आसवांची वाहिली ग.

अविनाशाच्या साउलींत
सुखाची घे सदा नीज
जीवनाचा दिव्य साज
दग्ध झाला.

# कवितेविषयीं —

मराठी काव्याला पुन्हां एकदा बहर आल्याच्या खुणा जिकडे तिकडे दिसूं लागल्या आहेत आणि त्यांतील प्रवृत्ति विविध व कित्येक वेळां तर दोन ध्रुवांइतक्या विरुद्ध टोंकाच्या वाटत असूनहि, त्यांच्यांत दिलजमाई आहे ही नवलाची गोष्ट आहे. भावकाव्याची एक विशिष्ट तऱ्हा कै. तांबे यांनीं सुरू केल्यानंतर त्या तऱ्हेचें काव्य बरेंच निर्माण झालें. रविकिरणमंडळावरहि याचे परिणाम निःसंशय घडलेले आहेत. त्यांतूनच भावात्म गीतगुंजनाची नवी माधुरी निर्माण झाली, परंतु या भावगुंजनांत बराचसा आडपडदा कायम राहिला होता. कै. तांबे यांच्या काव्यांत शाहिरी किंवा उर्दू काव्यांतील इष्काची झांक असूनहि, त्यांत शालीन संयम असल्यामुळें, तेथें दिलखुलास आणि धीटस प्रणयोद्गारापेक्षां अप्रत्यक्ष व सूचक गूढगुंजनाचाच आश्रय केलेला आढळतो. पुढेंहि हीच पद्धति प्राधान्यानें कायम टिकली; परंतु कुसुमाग्रज–बोरकरांपासूनच्या पुढच्या कवींत मात्र या प्रेमपूजेनाला वेगळीच छटा प्राप्त झाली आहे. प्रणयाच्या आविष्काराला वाङ्मयीन किंवा अन्य रूढ नीतीच्या किंवा संयमाच्या मर्यादा कृत्रिम वाटण्याइतक्या आड येत असत, त्या या कवींनीं दूर सारल्या. तांबे, रविकिरणमंडळ, यांपासून स्फूर्ति मिळवून, त्यांच्याच रचना–प्रबंधाचा प्रामुख्यानें उपयोग करूनसुद्धां, ही मंडळी जुन्या अभिजात कालांतील सूचक उत्तानतेकडे वळली किंवा लावणीकार–शाहिरांच्या धीटस श्रृंगार–दर्शनाचें अनुकरण करूं लागली.

ताशीव आणि घडीव शद्वांच्या साचेबंद रचना जाऊन त्या जागीं सरळ, साध्या पण अर्थव्यंजक अशा लौकिक शद्वांना त्यांचें स्वाभाविक स्थान परत मिळालें. श्री. बोरकरांसारखे कवि तर शद्वांच्या अनुपम कसरती करूनहि प्रेमभावनेची व सौंदर्यनिष्ठेची अभिव्यक्ति प्रभावीपणानें करून दाखवूं लागले. श्री. रेगे यांनीं संस्कृत साहित्यशास्त्रालाहि (आणि शास्त्र्यांनाहि) क्षणभर दिङ्मूढ करतील अशा सूक्ष्मातिसूक्ष्म व्यंजना, शृंगाराची ऐंद्रिय संवेदनात्मक (Sensuous) अभिव्यक्ति करतांना आपल्या अनेक काव्यांत प्रकट केल्या. या काव्यांतील भावना सौंदर्योपभोगाची स्पष्ट असते, पण ती अतिशय सौंदर्यक्षम अशा शद्वसंहतीनें सूचित केली जाते. श्री. पोवळे यांच्यासारखा कवि तर यापुढें जाऊन लालस प्रणयासक्तीचीं चित्रें उघड उघड उत्तानपणें आणि उन्मत्तपणें काढण्यास बिचकत नाहीं. पण या काव्याबरोबरच श्री. माडगुळकर–बढे यांची सरस–मधुर असूनहि भावोत्कट अशी कवितासुद्धां लिहिली जात आहे. या दोघा कवींची शक्ति तर अजब आहे. साध्या पण वेंचक शद्वांतहि केवढें अर्थव्यंजक सामर्थ्य भरलेलें असतें तें त्यांनीं आपल्या अनेक काव्यांत व्यक्त केलें आहे. आजचे अनेक नवोदित कवि या धर्तीची काव्यनिर्मिति करीत आहेत. श्री. शंकर रामाणी किंवा श्री. मंगेश पाडगांवकर यांसारख्या तरुण कवींच्या कृतींत ही शक्ति उत्तम प्रगट होऊं लागलेली आहे. आणि या सर्व भावकाव्यात्म कविता आणि नवप्रतिमांनीं व्यक्त होणारी तथाकथित "नवकविता" हि सारखी वाढत आहे. असा हा कवितेचा बहर विविध आणि रुचिर आहे.

## शाहिरांचा दिलखुलास प्रणय

श्री. बी. रघुनाथ यांचीं काव्यें वाचल्यावर मला वरील भोगलालस आणि दिलखुलास शाहिरी कवितेची आठवण झाली. योगायोगानें मी शाहिरी लावणीप्रकाराचें अध्ययन याच सुमारास करीत असल्यामुळें

त्यांच्या कवितेंतील "साजऽण माडिचा चढे जिना" सारख्या ओळींनीं मला लावण्यांतील कित्येक भोगातुर उद्गारांची सार्थता पटवली. बी. रघुनाथ यांनीं अर्थातच, लावणीकारांचें शब्दश: अनुकरण केलें आहे असें कांहीं म्हणण्याचा माझा आशय नाहीं. पण लावणीकारांच्या काळीं साध्या मराठीं शब्दांना जी शृंगारसूचक अर्थघनता होती ती तशाच तऱ्हेच्या वातावरणांत या कवितांतहि मला आढळली. मी त्यांच्या कवितांचा हा एक विशेष समजतों. त्या कवितांतील अर्थव्यंजकता श्री. रेगे यांच्या काव्याइतकी नवनवोन्मेषशाली नाहीं तशीच ती. श्री. पोवळे यांच्या काव्याइतकी उत्तानोत्कटहि नाहीं. परंतु ती पुरेशी सूचक आणि साजेशी उत्कट आहे. म्हणजे या कवितांतील प्रणयदृष्टि संयत असूनहि सूचक आहे आणि गाढहि आहे. कवि हा सौंदर्यपूजक स्वभावत:च असतो. पण बी. रघुनाथ यांच्या कवितांतील अभिव्यक्ति 'रूप-लुब्धाच्या आठवणीं' नीं भरलेली आहे. ते प्रणय किंवा प्रेमाच्यासाठीं 'रंग' शब्द खास सार्थपणें वापरतात. त्या काव्यांतील नायिका "रंग-रंजना" आहे, "रंग–रमा" आहे. प्रेयसीला साधाच व्यावहारिक प्रश्न प्रेमिक विचारतो, "रंगरंजने, तुझ्या साडिला देऊं कोणता रंग?" परंतु या साडीच्या स्थूल रंगाआड एक सबंध सृष्टि उभी आहे आणि ती अंत:संवेदनात्मक आहे. म्हणूनच कवि त्या "रंगरंजने" ला म्हणतो : "अंतरंगिंच्या रंगसंगातिंत राहुंत, सजणी, दंग" अशी ही लालस, आतुर रतिरंगाची सृष्टि आहे. "दर्पणा." ला उद्देशून लिहिलेल्या काव्यांतहि अशीच मृदु–मादक भोगलालसा आहे. या काव्यांतील शब्दयोजना उघडउघड लावणीची स्मृति घडविणारी आहे. त्यांत लावणीतील रंग आहे, "चवणा" सारखे शब्द लावणींतील साहचर्यांनीं अर्थव्यंजक बनलेले आहेत, 'असभ्य साऱ्या तुझिया लीला' यांनीं ध्वनित केलेला शृंगार तेथें आहे. पण पुढच्या "उन्हांत बसली न्हात" या कवितेंतील शब्दचित्र याहूनहि नटिस आणि धीटस साधलें

आहे. आडगांवांतील तें दृश्य आहे. उघड्या आडोशांत नवतीची नार उन्हांत न्हात बसली, तिचें हें शद्बचित्र आहे. तिच्या शरीरावर फक्त "जलवेष" आहे (केवढा सूचक व व्यंजक हा शद्ब!) घराची तिरपी सावली तें मनोरम चित्र पाहण्यासाठीं जणुं वांकली आहे. बाजूला "बारामासी" आणि शेवंती फुलल्या आहेत. कोंग्यांचा एक थवा या 'राणी' चें 'मंगल न्हाणें' गात बसला आहे.

"पलिकडच्या पाहते मळ्यांतुन
आंबराइ क्षण मान उंचवुन
बिंब वसंताचें का झळकें
दिवसाच्या आयन्यांत!"

असें हें उत्कट पण संयत असें लोभसवाणें शद्बचित्र आहे. "झाली संध्याकाळ" या कवितेंतील शद्बचित्रसुद्धां कांहींसें असेंच आहे. तेथेंहि शद्बयोजना अशीच 'रंग' सूचक आहे, मोहक अनुप्रासाचा वापर आहे. "रात रमा गुंफिते सुरंगी सांध्य घनांची माळ" अशासारख्या चरणांत कवि शद्बांच्या मोहकतेंत नव्हे तर मोहांत गुरफटलेला दिसला तरी पुढें "नवतिचा अंचळ सफळ रसाळ" किंवा "आठवितो पांथस्थ गवाक्षांतले वदन घोसाळ" वगैरे चरणांत शब्दचित्राचें सामर्थ्य मात्र प्रकट होतें.

## सुंदर शब्दशिल्प

या आणि इतर कांहीं कवितांत दृष्टीच्या संवेदनेला आवाहन आहे. कोणत्याहि माध्यमांतून प्रकट होणारी निर्मिति प्रथम दृष्टीलाच संवेदित करीत असते. दृश्यात्मक संवेदना सापेक्षतः स्थूल म्हणूनच सर्वसाधारण असते पण या कवीला केवळ दोन सीमांची (tow demensions) रंग-कलाच फक्त सूचित करावयाची नाहीं, त्याला तीन सीमांनीं

three dimensions नीं अंकित अशी शिल्प किंवा मूर्तिकला ध्वनित करावयाची आहे. आणि त्यांतहि मंथर गतीची छटा उमटवावयाची आहे. असा प्रयत्न "नेस नवी साडी" या कवितेंत आहे. प्रसंग पुन्हां अगदीं घरगुती आणि ठराविक वाटण्यासारखा आहे. प्रियकर प्रेयसीला नवी साडी नेसावयास सांगतो आहे. परंतु या प्रसंगीं नायकाची दृष्टि मात्र शृंगारलालस नाहीं, ती उत्कटपणें सौंदर्यसाधक आहे. प्रमाणबद्ध शरीरावर सुडौल वसन परिधान केलेल्या रूपसीचें हृद्य वर्णन करून कवि पुढें म्हणतो :

"कुतुकें शेजारिणिचीं
रंगांचीं शोभेचीं,
लचक लरा झांकुनि क्षण
प्रौढ ही उफाडी.
मंदिरिंच्या मूर्तींनो,
सुभग सुखद पूर्तींनो,
घ्या तुमचे बघुनि रूप
आणि अंगमोडि.

अशी ही रंगरमा प्रतिशिल्पमूर्ति आहे. शब्दांच्या या सामर्थ्यासाठीं तरी ही कविता वाचनीय वाटते.

**मोहक सूचकता**

पण स्पर्शाची सूक्ष्म संवेदनाहि या कवीनें फारच मोहकपणें सूचित केलेली आहे. "रात्र संपली" या कवितेंत ही गोष्ट नजरेस पडते. त्यांत "स्पर्शाकुल शिणलेल्या सोनसळीची झळई" "अरुवार अरुण" उगवण्याच्या सुमारास झगमगूं लागलेली दिसते. पण या विशेषाचें अस्फुट व हृदयंगम सूचन 'लहर' नांवाच्या कवितेंत झालेलें आहे. अतिशय मोहक अशा शब्दांचें रेशीम किंवा मखमलच आपण हातांत धरल्यासारखें ती कविता वाचतांना वाटतें.

"लहर बहरली ग ऽ
रति नयनांतुन समागमाची
धुंदिल धून लहरली ग ऽ!"

या 'रंग-रमे'च्या गालीं-गात्रीं 'नवीच मुसमुस' 'लहडली नि मोहरली' आहे, ती मानिनी 'स्वयंतरंगीं अंगोपांग डवरली' आहे आणि हें सर्व वाचीत असतां वाचकांच्या मनांतूनहि एक मधुर कंपनाची लहर झणझणत जाते.

अशा या प्रणयरंगाच्या हळुवार आणि धीटस कवितांत आणखी एका कवितेचा उल्लेख करावयाचा आहे. तिच्यांतील वातावरण उघडउघड भोगलालस आहे. तेथें शृंगाराचा भूलभुलैया आहे, लावणीच्या लकबींतील विरोधाभासात्मक चमत्कृति आहे. 'कशाला मुखीं पुन्हां तांबूल!' या नांवाची ती कविता आहे.

"कशाला मुखीं पुन्हां तांबूल ?
गुलाब शोधित झुरुनि मेले
कांट्यावर बुलबूल !
पदर सरळ तरि भांग वाकडा
चार जणींचा तसा न मुखडा
खडा न टाकिल कोण बघुनि ती
हूल तशी चाहूल ?
सरळ सोवळ्या शुकसनकांना
पापणिचा पडतांच उखाणा
उकलूं जातां होतिल गुंतुनि
ते आकुळ व्याकूळ !"

अशी ही रतिलेखनपटु कामिनी आहे, पण

"विषें विविध पचवूनहि उरशी
मोहक हंसरें फूल !"

अशा प्रकारचें सत्य सहानुभूत रसिकाला मनोमन पटलेलें आहे.

## हंसरें फूल

बी. रघुनाथ यांच्या एकंदर रंगरंजित कवितांबद्दलहि असेंच म्हणावेसें वाटतें कीं, त्यांत कित्येक ठिकाणीं शाब्दिकता, अनिर्बंधता असूनहि ती कवितासृष्टि 'हंसरें फूल' राहिली आहे हें विशेष होय! नाहीं तर आसक्तीच्या आणि भोगलालसतेच्या उत्कटतेचीं काव्यें गावयास जातां जातां, विकलगात्र छायामयी गणिकांप्रमाणें तेथें केवळ कामुकतेचीं असुंदर वर्णनें मात्र हातीं येण्याची परिस्थिति कशी येते; तें मराठी काव्याच्या प्रांतांतहि आपणांस सहज दिसून येईल. बी. रघुनाथ यांनीं हा धोका यशस्वीपणें टाळला आहे व म्हणूनच 'आली रे नगर भवानी,' 'दुर्मुखली,' 'मुलीस आला राग' 'अरे त्या आंधळीस कुणिं सांगा' वगैरे कवितांतहि बी. रघुनाथांची सूचक शैली आढळून येते. विशेषतः 'दुर्मुखली' मधील 'नवी थरारी' 'नवी उभारी' किंवा 'उदास कुस्कर' यासारखे अर्थसूचक नादांचे (onomatopoeic) शब्दप्रयोग किंवा 'मुलीस आला राग' मधील 'गोड विषाचा नाग' यासारखे विरोधाभासात्मक प्रयोग चांगले परिणामकारक झाले आहेत.

* * *

## दृढतर आत्मविश्वास

ही प्रेमगीतांची बाजू सोडून दुसरीकडे वळलों तरी तेथेंहि मला चांगल्या काव्यांना बहार आलेला दिसतो. प्रमाणांत तो कमी आहे एवढें खरेंच, पण तोहि चांगला भरघोस आहे. ''रे ओल्या काष्ठा,' 'हा ऋतु निराळा', 'वर्ष नवें', 'पथदीप,' यांत गंभीर आशय आढळतो, उत्तम वातावरण–निर्मितीची शक्ति प्रत्ययास येते. 'रस्ता नागर झाला'' 'मुद्रिका', किंवा 'राव' यासारख्या कवितांत उपरोधहि आहे; पण मला तो विशेष हृदयंगम वाटला नाहीं.

या प्रणयेतर कवितांतील एका सुंदर कवितेवरूनच कवीनें या संग्रहाला शीर्षक दिलेलें आहे. कवीच्या वैयक्तिक जीवनांतील घटनेची येथें अस्फुट स्मृति उमटलेली आहे. इतर सर्वांप्रमाणेंच हेसुद्धां मानवीच असतात आणि इतर सर्व क्षेत्राप्रमाणेंच काव्याच्या क्षेत्रांतहि वैकल्याचा आणि नैराश्याचा पगडा व्यक्तिमनावर बसतो. कदाचित् अंतस्थ विफलतेच्या, काव्यक्षेत्रीय 'मरणा' च्या, अस्फुट जाणिवेनें कविमन प्रकाश गमावून बसून अंधारांत चांचपडत असावें, पण अशा मनाला केव्हां 'घन तमीं राज्य' करणाऱ्या शुक्राच्या दर्शनानें पुन्हां स्फूर्ति प्राप्त होते, केव्हां हेमन्त शिशिराच्या अंतीं फुरारणाऱ्या वसंताच्या जाणिवेनें पुन्हां संजीवन मिळतें, कधीं अंधाराच्या पडद्याआडून अवतीर्ण होणाऱ्या उषेच्या दर्शनानें पुन्हां सौंदर्यसाक्षात्कार होतो. या कवीला 'पुन्हां नभाच्या लाल कडा' दिसूं लागल्या आणि काव्य-जीवनांतील हरपलेलें श्रेय त्याला पुन्हां गवसलें. हा अनुभव व्यक्त करणारी कविता या संग्रहांतील एक उत्कृष्ट कविता आहे. कवीच्या मनांत दारुण 'उदासीनता' होती. पण त्यानें 'नवतृष्णा फुलवून' 'तमःसिंधूचा तळ उपडा' करून टाकला आहे. 'असफलतेच्या वेदना' खलून त्यानें कळ्या फुलांना देऊन टाकल्या आहेत; तेथें 'दवांत' आतां 'नवता' पुनःपुन्हा हांसत आपला 'मुखडा' पाहील असा त्याला विश्वास वाटत आहे; म्हणून तो आत्मविश्वासपूर्वक म्हणतो आहेः

> " ये भवितव्या, रूप इथुनि ने !
> तुझें हांसु हें माझें गाणें !
> अमर माझिया मी मरणानें !
> नको आतां ग बसूंस जुळवित
> स्वप्नांतील तुकडा–तुकडा ! "

अशा या आत्मविश्वासाच्या पोटींच याहून महत्तर सृजनात्मक निर्मितीची शक्ति आहे. या एकंदर काव्यांत आढळणारा विविधतेचा

अभाव रचनेचा तोच-तो-पणा, शब्दांचा मोह वगैरे, कमीअधिक प्रमाणांत दिसणारे दोष जाऊन प्रणयालाच व्यापक मानवता साथ देऊं लागेल, रचना अधिकाधिक सघन होईल, आशय-विषयांतील वैविध्य व वैचित्र्य वाढेल, अशी खात्री यामुळेंच आपल्याला वाटते. हा दुर्दम्य आशावादच खऱ्या काव्याला व खऱ्या जीवनाला विकसित करीत असतो. या कवीच्या बाबतींतहि तो तसाच निर्माणक्षम ठरेल असा विश्वास मला वाटत आहे.

**डॉ. ना. ग. जोशी** एम्. ए. पीएच्. डी.

# बी. रघुनाथ

## व्यक्ति-परिचय

कै. बी. रघुनाथांचा परिचय करून देतांना मला एकाएकी एकलव्याचें चरित्र आठवलें. द्रोणाचार्य कौरवपांडवांचे धनुर्विद्याप्राध्यापक म्हणून नियुक्त झाले, तेव्हां त्यांच्या धनुर्विद्यापाटवाची कीर्ति ऐकून व्याधपुत्र एकलव्य शिष्यत्व स्वीकारण्यास आला, तथापि धनुर्विद्या प्राप्त करून घेण्याची एकलव्याची निष्ठा एवढी दृढ होती कीं त्यानें द्रोणाचार्यांची मृण्मय मूर्ति केली; आणि तिच्या मार्गदर्शित्वाखालीं धनुर्विद्येंत अशी पारंगतता प्राप्त केली कीं एका प्रसंगीं स्वतः द्रोणाचार्य चपापले. पात्रता आणि प्राविण्य मिळविण्याचे विधियुक्त मार्ग अगम्य झाले तरी स्वावलंबन आणि निदिध्यास यांच्या योगें या जगांत अप्राप्य असें कांहीं नाहीं; या सिद्धांताचें मूर्तिमंत रूप म्हणजे एकलव्याचें चरित्र आहे. ज्ञानमंदिराच्या गर्भगृहांत प्रवेश मिळविण्यासाठीं महाविद्यालयांच्या ज्या कक्षा ओलांडाव्या लागतात त्या ओलांडण्याइतकी अनुकूलता आणि निश्चितता नसल्यामुळें बी. रघुनाथांना जो चटका बसला त्याचा दाह त्यांनीं परिश्रमपूर्वक वाचन चिन्तन आणि अवलोकन यांनीं शान्त केला. अधिकृत पदवीधरांना हेवा वाटावा एवढी साहित्यिक प्रतिष्ठा आणि कलानैपुण्य त्यांनीं संपादन केलीं.

महाराष्ट्रपरिचय नांवाचा हजार पानांचा एक भक्कम ग्रंथ पुण्याहून प्रसिद्ध झाला आहे. त्यांत महाराष्ट्रविभवाचे शिल्पकार नांवाचें एक

६० पानाचें सदर दिलें आहे. या भागांत वेगवेगळया काळांत वेगवेगळया क्षेत्रांत आणि महाराष्ट्राच्या भिन्नभिन्न विभागांत आपआपल्या कर्तबगारीचा कायमचा ठसा उमटविणाऱ्या व्यक्तींचीं लघुचरित्रें आहेत. त्यांत बी. रघुनाथांच्या चरित्राची गणना झाली आहे.

बी रघुनाथ नांव धारण करण्यापूर्वी ते फुलारी होते आणि त्याहि पूर्वी भगवान रघुनाथ कुलकर्णी होते भगवान रघुनाथांच्या शालेय जीवनाचें अधिकृत असें जें टिपण आहे त्यांत त्यांचा जन्म ९ मेहेर सन १३२२ फसली असा दिला आहे. ही तरीख शुक्रवार १५ ऑगस्ट १९१३ अशी आहे. भगवानरावांचा जन्म झाला त्या दिवसाला एका कुलकर्ण्याच्या महाराष्ट्रीय कुटुंबांत पुत्रप्राप्तीचा आनंद झाला यापेक्षां जास्त महत्त्व नव्हतें. कित्येक गोष्टी जेव्हां घडतात त्यावेळीं त्या इतक्या सामान्य वाटतात कीं कोणाच्याहि लक्षांत भरत नाहींत, पण हा मानवी बुद्धीचा दुबळेपणा आहे. निसर्गाच्या नियमबद्ध व्यवहाराला यामुळें बाधा येत नाहीं १५ ऑगस्ट या दिवसाला आज प्रचंड जागतिक महत्त्व आलें हें सांगण्याची आवश्यकता नाहीं.

भगवानरावांचें घराणें परभणी जिल्हयांतील सातवण्याचें. वडील रघुनाथराव त्या काळच्या व्यावहारिक चौकटींत वसणारे पण बुद्धिमान गृहस्थ होते. भगवानरावांच्या बुद्धीची विच्छेदक प्रखरता त्यांना वडिलांकडून मिळाली तर त्यांच्या साऱ्या कोमल कमनीय भावनाराशींचें लोण त्यांना त्यांच्या विद्यमान मातुःश्रीकडून मिळालें असावें, असें दिसतें. महाराष्ट्रांतल्या कुलकर्ण्यांचीं घराणीं वंशशास्त्राच्या दृष्टीनें मोठीं अभ्यसनीय आहेत. बुद्धीचा उपयोग सत्कारणीं होवो कीं अन्यथा होवो. पण बुद्धि तत्त्वाची भरपूर पैदास मात्र या घराण्यांतून झाली आहे.

दोन तपांपासून माझी त्यांची ओळख होती. या कालांत जेव्हां म्हणून त्यांच्याशीं बोलण्याचा प्रसंग आला, पांच मिनिटांपासून पांच

तासांचा अवधि व्यापणारें भाषण किंवा संवाद झाले, एका चार ओळीच्या कार्डापासून कादंबरी किंवा निबंधसंग्रह वाचण्याइतपत त्यांच्या व्यक्तित्वाचा प्रकाश पाहिला. प्रत्येक वेळीं त्यांचें वैशिष्ट्य काय अंदाजलें तर त्यांची तीव्र प्रज्ञा असेंच सांगावें लागेल. त्यांच्या भावनांची आणि हृदयाची घडण सहानुभाव, सौंदर्यप्रीति, सौजन्य, सौष्ठव यांनीं बनली होती. नीटनेटकेपणा, कष्टाळुपणा इतरांसाठीं खस्ता खाणें हीं त्यांच्या स्वभावाचीं वैशिष्ट्यें त्यांनीं मातुःश्रीकडून स्वीकारलीं होतीं. आणि शेवटच्या क्षणापर्यंत हेच त्यांचे व्यक्ति विशेष तिच्याच मार्गदर्शनाखालीं फोंफावले होते.

माझ्याजवळच्या शालेय टिपणांत ९ सप्टेंबर १९२२ या दिवशीं ते विवेकवर्धिनी या पाठशाळेंत चवथ्या इयत्तेंत दाखल झाले असा उल्लेख आहे. वडिलांच्या मृत्यूनंतर हैद्राबादेस एका नातेवाइकाकडे ते राहण्यास आले. गवळीगुडाचमन या भागांत ते राहात असत. ते फोर्थ फॉर्म म्हणजे सध्यांच्या आठव्या इयत्तेंत दाखल झाले. पुढील तीन वर्षांच्या मार्कांचीं नोंद या टिपणवहींत आहे. वरती आदर्शांचीं नयनरम्य शिखरें आणि तळघरांत खर्डेघाशीसारखा रसहीन धोपटमार्गावर रखडणारा जीवनक्रम अशा शिक्षकांच्या परीक्षेंतून निर्माण तरी काय व्हावयाचं? इंग्रजीमध्यें त्यांना एकदां शेकडा ३६ व मराठीमध्यें शालान्त परीक्षेंत ६० असा गौरवास्पद उल्लेख आहे. दलितांच्या हृदयाचें सूक्ष्मतम स्पंदन हळुवारपणानें हेरणारा भगवान शालेय गणितांत मात्र कच्चा होता. २५ मार्कांच्यावर कांहीं त्याला सरकतां आलें नाहीं. कोणाच्याहि स्थूल दृष्टीला चटकन दिसणारें भगवानरावांचें अक्षर मात्र मराठींत very fair पासून good आणि इंग्रजी अक्षर fair पासून very fair हे शेरे घेण्याइतपत प्रगत झालें होतें. त्यांचें अक्षर पुढें पुढें तर फारच नितान्त रमणीय बनलें. सुवर्णमोहरांचा स्राव करणाऱ्या

टंकसाळीच्या यंत्राप्रमाणें सरासर सुडौल अक्षरांच्या ओळींच्या ओळी लिहिलेले किती तरी कागद आहेत गंभीर अर्थाचें बावनकशी सोनें आणि त्यांत राजमुद्रेचा दरारा आहे! परभणी शद्ब माथ्यावर लिहितांना विशाल उदराचा 'प' काढून त्याच्या वर्तुळ रेषेंत ऐटींत 'रभणी' अक्षरें बसवलेलॉं कितीतरी पत्रें माझ्या संग्रहांत आहेत.

सहाध्यायांत अबोल पण समजुतदार, मानी आणि निःस्वार्थी इतरांच्या आचरणांतील दोष व विसंगती जाणणारा पण खवचटपणानें कधींच दंश न करणारा मित्र अशीं त्यांचीं लक्षणें होतीं. शक्तीच्या ऐवजीं युक्ति व चपळता उपयोगी पडेल अशा हुतुतुच्या खेळांत ते उत्तम खेळाडू म्हणून ठरत. पण व याचा बारा ते सोळा वर्षांचा काल सुखांत आणि निश्चिततेंत गेला नाहीं. खाण्यापिण्याची आबाळ झाली. सुखांत वाढलेल्या माणसाचा भरदार गोलाकार त्यांच्या शरीरानें कधींच धारण केला नाहीं. कवितांचें पाठान्तर चांगलें होतें. वृत्तें, यमकें त्यांची लयबद्धता नादमाधुर्य आणि ध्वनि यांचा आस्वाद चाखण्याची रसिकता होती. त्यांनीं एकदां इतिहास भूगोलाची उत्तरपत्रिका ओव्यांतच लिहिली होती असें त्यांच्या एका अध्यापकानें व माझ्या सहकाऱ्यानें मला सांगितलें आहे. इ. स. १९३० सालीं, भगवानराव मॅट्रिकच्या वर्गांत होते, आणि मी त्यांच्या वर्गाचा इंग्रजी विषय शिकवणारा व वर्गशिक्षक होतो, शालेय पुस्तकांव्यातिरिक्त त्यांचें वाचन फार विस्तृत होतें. जें जें हातांत येईल तें वाचायचें. परंतु श्रमांची काटकसर करायची. उत्तम व शाश्वत मूल्यवान कोणतें हें अंदाजण्याची त्यांची शक्ति लवकरच प्रखर बनली तेव्हां पासूनच ते बालकवि, विनायक केशवसुत, टिळक, गोविंदग्रज, फडके, खांडेकर माडखोलकर, वामन मल्हार यांच्या साहित्यावर लुब्ध झाले होते. मराठी नियतकालिकेंही बारकाईनें न्याहाळीत.

—

१९३० सालींच कै. न्यायमूर्ति केशवराव कोरटकर यांनीं मराठवाड्यांतील साहित्य निर्मितीला चालना मिळावी म्हणून राजहंस मासिक सुरू केलें. मी राजहंसाचा संपादक बनवला गेलों. मी लेखन साहाय्य करूं शकणाऱ्या मित्रांचीं नांवें अंदाजिलीं. त्या वेळीं भगवानरावांच्या सुवर्णमय तेजस्वी अंतरंगाची मला पारख करतां आली, हें मी माझें सद्भाग्य समजतों. मी एकदां त्यांना मधल्या सुट्टींत गांठून म्हटलें, "राजहंसाची संपादकीय जबाबदारी मजकडे आहे. तुम्ही सुंदर कविता लिहितां हें मला माहिती आहे. तुमच्या कविता द्या ना आमच्या राजहंसासाठीं." त्यांच्यांत व माझ्यांत विश्रब्ध स्नेह उत्पन्न झाला तेव्हां ते म्हणत, "त्या दिवशीं मला जेवढा आनंद झाला तेवढा क्वचित्‌च मला पुनः केव्हां झाला असेल." इ. स. १९३० मे राजहंसाचा पहिला अंक निघाला. फुलारी या नांवाखालीं भगवानरावांच्या कविता मी संपादक होतों तोंपर्यंत प्रत्येक अंकांत प्रसिद्ध झाल्या.

१९३२ पासून ते परभणी येथें लोककर्म खात्यांत हंगामी कारकून म्हणून काम करूं लागले; आणि याच खात्यांत कौटुंबिक निर्वाहासाठीं झिजून ७ सप्टेंबर १९५३ रोजीं कार्यालयांत कामाच्या टेबलावरच शाश्वत शांतींत विलीन झालें. या एकेवीस वर्षांच्या कालांत त्यांनीं जगात जें जें पाहिलें, ऐकलें आस्वादलें व उपभोगलें, "संस्कारांचे पराग आणि संज्ञांच्या फुलपाखरांनीं खूप मनभरणी केली", ज्यांचें चिन्तन केलें, ज्या वांछनीय गोष्टींबद्दल त्यांचें अन्तःकरण अतृप्त राहिलें त्या सर्वांचें त्यांच्या व्यक्तित्वाच्या मुशींत वेळोवेळीं तयार झालेलें रसायन त्यांच्या तेरा चवदा पुस्तकांच्या रूपानें सरस्वतीच्या जामदारखान्यांत उपलब्ध आहे. आडगांवचे चौधरी, पुनः नभाच्या लाल कडा आणि आकाश हीं त्यांचीं पुस्तकें त्यांच्या देहान्तानंतर जनमानसमंदिरांत बागडण्यासाठीं जन्माला येत आहेत.

परभणीचा त्यांचा जीवनकाल आणि क्रम यांचा विचार केला म्हणजे कर्तबगारी, धैर्य, बुद्धिमत्ता, समंजसपणा, निरलसता, समाधान इत्यादि गुणांचे अर्थ नव्या झळाळीनें मनश्चक्षूंपुढें चमकूं लागल्यासारखें वाटतात. परभणीसारख्या मराठवाड्यांतील जिल्ह्याच्या केन्द्रीं मॅट्रिकची परीक्षा पास असलेल्या एका कारकुनाला महाराष्ट्राच्या विभवाचा शिल्पकार बनण्याची काय अनुकूलता होती? उच्च शिक्षण प्राप्त झालें नाहीं, उत्तम पुस्तकांचें ग्रंथालय नाहीं, विद्वानांची संगति नाहीं, सभासंमेलनें नाहींत, उत्तम चित्रपट आणि नाटकें नहींत, कुटुंबाच्या प्राथमिक गरजा भागविण्याइतकेंहि वेतन नाहीं, माजोरी अधिकाऱ्यांच्या लहरीप्रमाणें खर्डेघाशी करण्याची नोकरी करून एखाद्या माणसाला कांहींच करतां आलें नसतें तर आपण त्याला दोष न देतां हें स्वाभाविकच झालें असें म्हटलें असतें. स्वतः भगवानरावांनीं २४ मार्च १९५१ च्या एका पत्रांत म्हटलें आहे, "छागल नांवाचा माझा एक कथासंग्रह प्रसिद्ध होतो आहे. जुन्याच एक वेळ प्रसिद्धि मिळालेल्या कथा आहेत. कवितासंग्रहाला मात्र प्रकाशक मिळेना. प्रस्तावनेसह सर्व कागद तसेच पडून आहेत. नवें लिहावयाला कल्पना खूप सुचल्या आहेत. पण मूड लागत नाहीं आणि लिहिणें होत नाहीं. आणखी कांहीं दिवस जातील. आणि चार संसारकरू माणसां सारखें जीवन जात राहील असं वाटतं." परभणींत त्यांनीं संगति निर्माण केली ती पत्रव्यवहारानें. त्यांच्याजवळील पत्रसंग्रहांत वि. स. खांडेकर, ना. सी. फडके, कवि यशवन्त, ग. त्र्यं. माडखोलकर, ना. ग जोशी, अनंत काणेकर, पु. भा. भावे, वा. ना देशपांडे, पु य. देशपांडे, पंडित यांच्या संगतीचा लाभ मिळाल्याचीं प्रमाणें आहेत. मराठींतल्या साऱ्या मासिकांच्या संपादकांशीं त्यांचा पत्रव्यवहार होता. प्रत्येक दिवाळी अंकासाठीं कित्येक मासिकांचीं त्यांना कांहीं तरी पाठविण्याचीं आग्रहाचीं पत्रें असत. मराठवाड्यांतल्या वा. रा. कान्त, हर्सूलकर, प्राध्यापक कहाळेकर,

प्रा. भगवन्तराव देशमुख, कवि यशवन्त कानिटकर, श्री. सेतुमाधवराव पगडी व वा. दा. गाडगीळ यांच्याशीं त्यांचा पत्रव्यवहार होता. एक वेळच्या कला मासिकाचे एफ्. बाबूराव, आगशीकर व सुषमेचे संपादक कुंडलराय मोहेकर या दोघांचा व भगवानरावांचा मोठा जिव्हाळा होता. आगशीकरांनीं मराठी शारदेच्या हाकेला पहिली 'ओ' देण्याचें श्रेय भगवानरावांकडून मिळवलें, गांजलेल्या व्यवहारिक जीवनानें अस्ताला गेलेला त्यांच्या व्यक्तित्त्वाचा प्रकाश 'पुनः नभाच्या लाल कडा' दाखवीत आहे तोंच हा सरस्वतीचा हा एकनिष्ठ सेवक कोठें लपला आहे हें शोधणाऱ्या आशेला कुंडलराय आकाश दाखवणार आहेत.

आर्थिक अननुकूलतेचा विषय तर न सांगताहि कळण्यासारखा आहे. ज्या युद्धकाळांत आणि नंतरहि चांगली ज्वारी 'रुपयास' तीन शेर मिळत नव्हती त्यावेळीं स्टीफन झ्वाइगचें इंग्रजी आत्मचरित्र अठरा रुपयाची व्ही. पी. सोडवून भगवानरावांनीं आत्मसात केलें. या त्यांच्या बौद्धिक गरजा आणि व्यावहारिक स्थिति किती केविलवाणी होती याची जाणीव त्यांच्याच एका पत्रानें करून देतों. भगवानरावांचें २४ डिसेंबर १९३६ चें एक पत्र त्यांच्या संग्रहांत मला आढळलें. आपल्या खात्याच्या वरिष्ठाला त्यांनीं तें लिहिलें होतें. वरिष्ठ रजा घेऊन मद्रास, बेंगलूर, मैसूर उटकमंड असे प्रवासास निघाले होते. प्रवासक्रमाच्या अनुरोधानें बेंगलोरच्या पत्त्यावर त्यानीं तें पाठवलें. नामांकित (Addressee) गृहस्थ येथें नाहींत सबब परत म्हणून यांच्याकडेच आलें. या पत्रांत वास्तवतेच्या निराळ्या पोषाखांत भगवान आपणांला दृष्टीस पडतील. त्यांतला कांहीं भागच येथें उध्दृत करतो. "आपणांस पत्र लिहितांना माझ्या मनाचा विलक्षण गोंधळ उडाला आहे. एक तर प्रथमच मी आपणांस लिहीत आहे. आणि दुसरें अशा रीतीनें पत्र लिहिण्याचा अधिकारहि मला नाहीं. या हास्यास्पद धाष्टर्याबद्दल मला क्षमा करावी. मी अद्याप आपल्या ऑफिसमध्यें टेंपररी मिस्त्री म्हणूनच काम करीत

आहे. गेल्या महिन्यांत वीस रुपयांवरच आमची बोळवण केली गेली; हें आपणांस समजलें असेलच. या महिन्यांत तर म्हणे, त्यांतहि कपात होण्याचा रंग आहे. अशी वार्ता ऑफिसमध्यें उठून किंचित् मनाचा उरलेला उत्साह देखील नष्ट होत आला आहे. आपल्या आगमनानंतर बरेच समाधानकारक वातावरण निर्माण होईल; असें वाटतें. येथें आपण आल्यावर मी पर्मनंट पोस्टकरितां ॲप्लिकेशन दिला आहे. त्याचा पुनः एकदां विचार करावा. आपण रजेवर जाण्यापूर्वींच मी धडपड करून एक प्रोबेशनर्सचें स्टेटमेंट तयार करवून सहीसाठीं पाठविलें होतें पण तें तसेंच राहिलें...आपण निघालात त्यावेळीं पुनः फाईल घेऊन येणार होतों. पण तेवढें धैर्य झालें नाहीं...आपण इकडे आल्यावर त्याकडे विशेष लक्ष पुरविण्याची दया करावी. प्रामाणिक विनंती खेरीज पत्र लिहिण्याचा माझा दुसरा कोणताहि हेतू नाहीं. जें प्रत्यक्ष भेटींत मला सांगतां येणें शक्य झालें नाहीं तें या पत्रीं निवेदन केले आहे. या अनाहूतपणा बद्दल एकदां क्षमा मागतो...उत्तरासाठीं स्टॅम्पस पाठवतो. आपलें उत्तर म्हणजे अपूर्व योगच वाटेल. एक उत्तराची आशा आणि अपेक्षा करायला काय हरकत आहे मग?"

१९३६ सालीं त्यांची 'ओ' प्रसिद्ध झाली आणि त्यांना साहित्यिक स्थैर्य आलें. मासिकांच्या संपादकांशीं त्यांच्या ओळखी झाल्या मासिकांच्या संपादकांवर वजन पाडण्याची हातोटी फार सफाइदारपणानें त्यांना साधली होती.एखाद्या सुविनीत सुविद्य सुंदरीनें माझ्या कॉलेजपर्यंत मला पोंचवा अशी एखाद्या स्वयंप्रेरिकागामी सुसंस्कृत तरुणाला विनंती केली तर ती जशी अव्हेरिली जाणार नाहीं त्याचप्रमाणें सुंदर अक्षरांत व्यक्त झालेली, मधुर अर्थानें थबथबलेली, एखादी चारुचरणी कविता एक लयबद्ध पत्राबरोबर पाठविली कीं तिचा हामखास स्वीकार व्हावयाचाच असा त्यांनीं आपल्या मनाशीं निर्णय केला होता. पोलिस एक्शन होईपर्यंत पारतंत्र्यानें पिचलेल्या समाजाचीं आर्त आक्रंदनें त्यांच्या

जिव्हारीं घाव घालीत. १९४६ सालीं भगवानरावांनीं काय म्हटलें होतें तें पाहा. लढाई संपल्यावर तरी असें कोणतें प्रसन्न दृश्य दिसतें आहे? अनीतीचे अशांतीचे नुसते खच पडले आहेत! कांहीं घडण्या ऐवजीं जिकडे तिकडे नुसता बिघाड दिसतो आहे. एकाचा अहंकार भडकला आणि वाटलें प्रलयानें आपले पाय रुतवले आतां! त्याच्या प्रतिकारासाठीं कित्येक शक्ति उठल्या! हातांत शस्त्र नसलेला, गुलामीच्या कवचांत गुदमरून जात असलेला, मोठमोठ्या वैचारिक आदर्शांची उपासना करणारा, मनुष्यजातींचें हित व्हावें अशी सदिच्छा बाळगणारा माणूस त्या तशा हादरलेल्या व डळमळल्या भूमीवर भविष्याकडे दृष्टि लावून बसला तो अहंकारी जगाचा नायनाट होऊन नवं मनः काल्पित आणि मनःपूजित जग निर्माण होणार अशा विश्वासानें!' पण वस्तुतःझालें काय तर मानवतेच्या संरक्षणाची ज्यांनीं शपथ घेतली, तेच संहाराचे विश्वव्यापी कट रचताहेत! विनाशाच्या पद्धतशीर योजना आखताहेत. रक्ताचें संरक्षण रक्त पिऊन करायचं... एवढी माणसं मारलीं गांवं बेचिराख केलीं तरी जुने डाग निघण्याएवजीं नवे कलंक चिरस्थाई झाल्याचं दिसतं आहे! ध्येयाचीं पटकुरं करायचीं, आदर्शांचे पायपोस करायचें एवढंच आजच्या बळानं साधलं आहे! आणि त्याला नतिकता आणण्यासाठीं सांधिक कार्यक्रम चालू आहेत!" वर्तमान कालच्या आन्तरराष्ट्रीय राजकारणाचें क्ष किरणांच्या साहाय्यानें सूक्ष्म अवलोकन करून महाराष्ट्रीयांना घडवलेलें हें दर्शन किती यथार्थआहे पहा! सप्टेंबर १९४८ नंतरच्या राजकारणाचा व्यवहार कसा होतो हेंहि त्यांनीं हेरलें. "जनता लिंबेटाकळी" ही त्यांची कथा त्या दृष्टीनें अतिशय लक्षणीय झाली आहे. समाजाच्या भवितव्याचा द्रष्टा असें म्हणवून घेण्याची त्यांची योग्यता होती हें या कथेवरून दिसतें. काल बदलला. चोहोंकडून कांहीं तरी भव्य आणि दिव्य घडणार आहे त्याची यांना जाणीव झालीच होती. त्यांचा धाकटा भाऊ शिकून मिळवता झाला. त्यामुळें

१८
वि.

त्यांना कौटुंबिक स्थैर्यहि लाभलें होतें. पण त्यांची प्रकृति खालावली शारीरिक आणि मानसिक ओझ्यांनीं विस्कटलेला आरोग्याचा मंडप तीं ओझीं सहन करीत पूर्वीसारखा बनणें फार कठीण असतें. तीं ओझीं दूर करतां येत नाहींत हाच तर त्या संकटांचा कठोर कावा असतो.

बी. रघुनाथांची समाजानें उपेक्षा केली असें म्हणणारांची काय अपेक्षा असते हें कळत नाहीं. १९३०. सालीं फुलाऱ्यांना कवि म्हणून प्रसिद्धि मिळाली. १९३२ सालीं कलकत्त्याहून प्रसिद्ध झालेल्या बृहन्महाराष्ट्र वार्षिकांत त्यांचा कवि म्हणून असा उल्लेख आहे. "या कवीचें शद्ब-सौष्टव आणि भावनाकोमलत्व अतीव मधुर असतें" १९३६ सालीं त्यांची 'ओ' प्रसिद्ध झाली. तत्पूर्वी आणि त्यानंतर त्यांचे लघुनिबंध कथा आणि कविता महाराष्ट्रांतल्या सर्व प्रमुख ठिकाणीं फडकल्या आणि चमचमल्या. अखिल महाराष्ट्रलघुकथा स्पर्धेत त्यांच्या कथा पहिल्या तीन क्रमांकांत आल्या त्यांची पुढील पुस्तकें प्रसिद्ध झालीं आहेत. १ ओ २ साकी, ३ फकीराची कांबळी, ४ छागल, ५ हिरवे गुलाब, ६ बाबू दडके, ७ उत्पात, ८ म्हणे लढाई संपली, ९ जगाला कळलं पाहिजे, १० अलकेचा प्रवासी, ११ आलाप आणि विलाप, १२ आडगांवचे चौधरी, १३ पुनः नभाच्या लाल कडा, (प्रकाशित होत असलेलें) १४ आकाश (आगामी)

माझ्याजवळ भगवानरावांचें एच्. एस्. एल्. सी.चें शालान्त जीवनाचें रेकार्ड आहे त्यांत त्यांच्या (Permanent and unalterable) खुणा म्हणून कपाळावर जखमेचा एक काळसर वण आणि गळ्यावर डाव्या बाजूस एक तीळ अशा दिल्या आहेत. या त्यांच्या शाश्वत-म्हणून मानल्या गेलेल्या खुणांच्या आधारावर त्यांचा कोणी आणि कोठें शोध करावा. पण या साहित्यसुवर्णकाराचे अलंकार मात्र महाराष्ट्र शारदा माझ्या भगवन्ताचा आहेर म्हणून शाश्वत धारण करील !

श्री. रघुनाथ अत्यंत मानी, निष्ठावान आणि करारी साहित्योपासक होते. त्यांच्या प्रफुल्ल अन्तरंगाच्या गंधानें त्यांच्याकडे आकृष्ट होईल तोच त्यांचा मित्र. आपणांत जें आहे तें यथार्थतेनें न जाणतां स्तुति किंवा निंदा करणाराला ते पोपट समजत. साहित्याची त्यांची प्रेरणा अर्थलाभात्मक कधींच नव्हती. साहित्यकुलेला कलावन्तीण बनवणें ते महान पाप समजत. ज्या उद्देशानें जें केलेंच नाहीं तो उद्देश सफल झाला नाहीं याची ना खंत ना खेद! जानेवारी १९३९ मध्यें एका प्रश्नावलीच्या उत्तरांत त्यांनीं श्री. व्यंकटेशराव पंडितांना पुढीलप्रमाणें लिहिलें आहे, "देशाच्या सद्यःस्थितींतील केवळ राजकीय पार्श्वभूमि माझ्या एकाहि कथेंत आढळणार नाहीं, किंवा गहन वाटणाऱ्या सामाजिक प्रश्नाची सोडवणूक केली आहे असेंहि नाहीं. असे प्रश्न ललित-लेखनानें सोडवलेच पाहिजेत असा आग्रहहि मला मान्य होण्यासारखा नाहीं. अनेक प्रकारांनीं असहाय असलेल्या जीविताविषयीं मला आत्यंतिक तळमळ वाटते. हीच तळमळ केवळ लिहिण्याच्या मुळाशीं आहे. अन् मला वाटतें ती शक्य तों माझ्या लिखाणांतून ओतण्याचा मी प्रयत्न केला आहे. रम्य जीवनाचें एक सुरंजित स्वप्न मी माझ्या डोळ्यांसमोर नेहमीं ठेवीत आलों आहे. प्रत्यक्ष जीविताच्या विकलतेवर जितक्या प्रकारांनीं प्रहार करतां येतील तितके केलेच पाहिजेत असें लेखकानें आपल्या मनांत नित्य वागवावें असें वाटतें. मी अमुक याच पक्षाचा आहे असें माझें मलाच स्पष्ट झालेलें नाहीं." इत्यादि. आदर्श साहित्याबद्दल भगवानरावांचे विचार त्यांनीं आपल्या "सुंदर पुस्तकं" या लघुनिबंधांत मांडले आहेत. "पुस्तकाचें सौंदर्य ही एक स्वयंसिद्ध गोष्ट आहे, अशी माझी निष्ठा आहे. लेखक कलावादी असो अथवा जीवनवादी असो. 'हम मिटें हैं तो उनकी अच्छी अच्छी किताबोंपर!' कला आणि जीवन परस्परांना पूरक आहेत. स्वप्नभूमि हेंच उत्कट जीवनाचें वास्तव जग आहे. जीवनाची उज्ज्वल आणि प्रगाढ स्वप्नं

चितारण्याशिवाय कलेचा हेतु तरी कोणता? जीवनांत या पुस्तकांशिवाय संचय करण्यासारखं आणखी आहेच काय? आयुष्याच्या शेवटल्या जंक्शनवरून निघतांना जीवनाच्या सूत्रधारानें थोडं जरी ओझं बरोबर नेण्याची परवानगी दिली तर माझ्याजवळ या सुंदर पुस्तकांचं एक लहानसें गाठोडें खात्रीनं राहीलच राहील!"

भगवानरावांच्या आजच्या या द्वितीय वार्षिक मृत्युदिनीं त्यांच्या अमर व्यक्तित्वाच्या चरणीं ही श्रद्धांजली समर्पण करतों.

दि. २८-८-१९५५ — र. मु. जोशी


८७११

ग्रंथ संग्रहालय ठाणे स्थळप्रत.
क्रम १०४५८ वि: ८/०८
क्रमांक ९३७८ नों: दि: ७/३१/५/५८

REFBK-0008711